
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष एकोणिसावे/अंक ५/मे २०१८

## संपादकीय

### शिक्षणाचे मेकॉलीकरण

१८३५ सालचे मेकॉलेचे (T. B. Macaylay) 'इंग्रजांचे भारतातील शैक्षणिक धोरण काय असावे?' या संदर्भात मार्गदर्शन करणारे इतिवृत्त (Macaylay's Minute), ते २००९ साली भारत सरकारने केलेला शिक्षणाचा अधिकार हा कायदा, या १७४ वर्षांत शैक्षणिक धोरणांपासून विचारांपर्यंत अनेक स्थित्यंतरे पहायला मिळतात. मेकॉले पूर्व सुमारे ५००० वर्षांचा इतिहास हा भारताच्या शिक्षण कौशल्याचा बोलका इतिहासच आहे. भाषा, गणित, स्थापत्य ते सर्वच कलांमधील रेखीवता या अपघातानी येत नसतात. अनेक वर्षांचे शिक्षण, कष्ट आणि मनोसामाजिक पार्श्वभूमी त्याला असायला लागते.

मेकॉलेचे इतिवृत्त हा भारताच्या शिक्षणाच्या इतिहासातील एक क्रांतीकारक टप्पाच आहे. १० व्या शतकापासून ते इंग्रजांचा साम्राज्यवाद प्रस्थापित होईपर्यंत आपल्यावर अनेक पाश्चात्य आक्रमणं झाली. तरीही १२ व्या शतकातील भास्कराचार्य ते १५ व्या शतकातील गणेशदैवज्ञापर्यंत भारताने गणित आणि अभियांत्रिकीच्या अनेक क्षेत्रांमध्ये मूलभूत योगदान दिलेले आहे. हे सगळं खरं असलं तरी, मेकॉले पूर्व भारत हा अशिक्षित होता या गृहितावरतीच आजची शिक्षण चर्चा रेंगाळलेली दिसते.

१९८३ साली श्री. धरमपाल यांनी 'द ब्युटीफुल ट्री' (The Beautiful Tree) हे पुस्तक लिहून मेकॉलेपूर्व १८ व्या शतकातील भारतीय शिक्षण पद्धती आणि साक्षरता याचा साधार इतिहास सादर केला आहे. ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी यांनी कुतूहलापोटी पंजाबपासून तमिळनाडूपर्यंतच्या तत्कालीन शिक्षण पद्धतीचा सखोल अभ्यास केला होता. प्रत्येक खेड्यातील शाळा, त्यांची विद्यार्थी संख्या, शिक्षक आणि या व्यवस्थेचा आर्थिक स्रोत यांचा 'तपशील' त्यांनी वेळोवेळी सादर केला. श्री. धरमपाल यांनी याच माहितीवरती आपले पुस्तक लिहिले आहे. श्री. धरमपाल यांनी १८ व्या शतकातील भारतातील तंत्रज्ञानाच्या विकासावरतीही असेच एक अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले आहे. या सगळ्याच गोष्टींवर आज विपुल संशोधनपर साहित्य उपलब्ध आहे.

१७८४ साली विल्यम जोन्स यांनी कलकत्त्याला एशियाटीक सोसायटीची स्थापना केली. १७८८ ला त्यांनी

(पृष्ठ क्र.२ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**


एशियाटीक रिसर्चेस (Asiatic Researches) ही संशोधन पत्रिका चालू केली. भाषा, साहित्य, स्थापत्यापासून विज्ञानापर्यंतच्या भारताच्या योगदानाचे अनेक लेख त्यामध्ये छापून आले. संस्कृत भाषेची महती त्याचमुळे जगाला कळली. मेकॉलेच्या काळी ही सर्व माहिती उपलब्ध असूनही मेकॉले आपल्या इतिवृत्तात म्हणतात की, 'भारतीय संस्कृती, भाषा, साहित्य आणि विज्ञान' हे सर्व मागासलेले आहे. भारतीय संस्कृती ही जंगली असून त्यांचा धर्म हा अंधश्रद्धा आणि विसंगतीनी भरलेला आहे. यांना सुसंस्कृत करायचे असेल तर त्यांना इंग्रजी भाषेतूनच शिक्षण द्यायला हवे. त्या काळातच मेकॉलेला अपेक्षित असलेल्या बदलाला सहमती दर्शवूनही शिक्षणाचं माध्यम मात्र मातृभाषा असावी, आणि परंपरागत शिक्षणाला एकदम सोडचिठ्ठी देऊ नये अशा मताचाही एक मोठा अधिकारी वर्ग होता. बनारस, मुंबई, पुणे येथील शिक्षणामध्ये जो आमूलाग्र बदल करण्यात आला त्यामध्ये या दुसऱ्या वर्गाचे लोक जास्त होते.

परंपरागत भारतीय शिक्षणपद्धतीला विराम देण्याचे काम १८०० च्या आत-बाहेरच चालू झाले होते. इथल्या जाती आणि वर्णव्यवस्था धर्मप्रसारकांच्या आड येत होती. १५ व्या शतकात युरोपमध्ये चालू झालेल्या प्रबोधन युगामुळे (Renaissance) तेथे चर्चचे वर्चस्व कमी होऊन औद्योगिक आणि विज्ञानक्रांतीला सुरुवात झाली होती. कोपर्निकस, गॅलिलिओ, ब्रुनो हे सगळे या विज्ञानक्रांतीचे सुरुवातीचे शिलेदार. या सगळ्यांना युरोपमध्ये ख्रिस्ती धर्माने प्रखर विरोध केला होता. ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकातील पाणिनी असो, तिसऱ्या शतकातील कौटिल्य असो, नंतर कामसूत्र लिहिणारा वात्सायन असो, आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त ते १२ व्या शतकातल्या भास्कराचार्यांपर्यत त्यांनी मांडलेल्या शास्त्रीय सिद्धांतांना आपली धर्मसंस्था किंवा धर्मगुरुंनी कधीही विरोध केला नव्हता. याचा अर्थ आपला धर्मव्यवहार आणि समाजसंबंध यामध्ये अनिष्ट गोष्टी होत नव्हत्या असे नाही. विचार आणि आचारामध्ये तफावत नव्हती असेही नाही. याची कारणमीमांसा हा वेगळ्या संशोधनाचा भाग आहे. धर्मप्रसारकांनी मात्र सामाजिक वैगुण्य अधोरेखीत करीत संपूर्ण संस्कृतीलाच सुरुंग लावायला सुरुवात केली.

भारतातील शिक्षण व्यवस्था ही विकेंद्रीत होती.

अनेकांचा असा एक गैरसमज आहे की, पाठशाळेतील शिक्षण म्हणजेच भारतीय शिक्षणपद्धती. समाजाचा विकास हा अनेक अंगांनी होत असतो. त्यांच्या गरजाही वेगळ्या असतात. या गरजांना पोषक असे व्यवसाय निर्माण होतात. सुतारकाम, लोहारकाम, कुंभार, गवंडी, व्यापार, वैद्यक, कृषी ते नौकानयन या सगळ्यांना लागणारे कौशल्य हे वेगळे असते. त्याची निर्मिती कदाचित १०-१२ वर्षांत निर्माण होऊ शकत नाही. यातले 'बारकावे' आणि 'हातोटी' ही पिढ्यान्‌पिढ्यांच्या अनुभवांतूनच निर्माण होत असते. हे शिक्षण मिळण्याचे केंद्र म्हणजे त्या व्यावसायिकाचे घर, आणि त्याचा समाजच असे. यातल्या सगळ्या गोष्टी या समाजाला दैनंदिन लागत असल्यामुळे कुठलंही कौशल्य एकमेकांवरती कुरघोडी करू शकत नव्हते. या शिक्षणाकरता राजा किंवा सरकारची कुठलीही गरज नव्हती.

(पृष्ठ क्र. ३९ वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा


## वर्ष एकोणिसावे/अंक ५/मे २०१८



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक ११ वा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | लक्षेम्बोर्ग येथील विज्ञान मेळावा | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्वदेशवेध–०७ अविश्वसनीय भारतः मेवाड | श्री. नरेंद्र गोळे | ९ |
| ४) | ओळख वनस्पतींची – गिरीपुष्प | श्री. प्रकाश दुधाळकर | १७ |
| ५) | देणाऱ्याने देत जावे – वेंकट क्रिश्नन् एन्. | गौरी अंबाजी परब | १९ |
| ६) | मराठी भाषेचे वैभव | श्री. अरविन्द दोडे | २२ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३० |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

\- संपादक

# लक्षेम्बोर्ग येथील विज्ञान मेळावा

*मार्च २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात युवक वैज्ञानिक संघटनेने लक्षमेम्बोर्ग शहरात एका विज्ञान मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यात चिपळूण येथील परशुराम एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतील दोन विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याच मेळाव्याचा हा संक्षिप्त अहवाल आहे– संपादक*

लक्षेम्बोर्ग हा युरोप खंडातील एक लहानसा देश आहे. निसर्गरम्य परिसर असलेला आणि आर्थिक स्थिती चांगली असलेला हा देश. या देशात एक युवक शास्त्रज्ञ संघटना आहे. या संघटनेच्यावतीने दरवर्षी मार्च महिन्यात एक विज्ञान मेळावा भरविण्यात येतो. या मेळाव्याला भारतातून विद्यार्थी पाठवा अशी विनंती या संघटनेचे अध्यक्ष हॅनोस कार्लो आम्हाला अनेक वर्षे करीत आहेत. दरवर्षी चीनमध्ये अशाच एका मेळाव्यात आमची त्यांच्याशी भेट होत असते. परंतु मार्च महिन्यात आपल्याकडे परीक्षा असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना घेऊन जाणे अडचणीचे होते. म्हणून आम्ही या स्पर्धेत सहभागी होण्याचे टाळत होतो. ऑगस्ट २०१७ मध्ये जेव्हा कार्लोस यांची चीनमध्ये भेट झाली तेव्हा त्यांनी पुन्हा आग्रह धरला. त्यांच्या आग्रहाचा मान ठेवण्यासाठी २०१८ च्या स्पर्धेत सहभागी होण्याचे आम्ही ठरविले. त्यानुसार आम्ही योग्य विज्ञान प्रकल्प आणि तो सादर करण्यासाठी दोन चुणचुणीत शाळकरी मुले शोधू लागलो. दरवर्षी विविध विज्ञान स्पर्धांना आम्ही विद्या प्रसारक मंडळाच्या शाळा आणि कॉलेजातील विद्यार्थी पाठवीत असतो. यावेळेस एखाद्या वेगळ्या शैक्षणिक संस्थेला संधी देऊ असा विचार विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी मांडला. त्यानुसार त्यांनी चिपळूणच्या परशुराम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नातू यांच्याकडे विचारणा केली. डॉ. नातू यांनी या संधीचा फायदा आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना करून देण्याचा निर्णय घेतला आणि प्रत्यक्ष कार्यवाही करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक केदार शिंदे यांना सांगितले. त्यांनी जातीने लक्ष घालून विद्यार्थ्यांच्या पालकांना समजावून दिले. याच शाळेतील एक विज्ञान शिक्षक श्री. पाध्ये यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याची जबाबदारी स्वीकारली. सगळे सोपस्कार झाल्यावर कुमारी रिद्धी जावकर आणि कुमार मिहीर ओक हे दोघे मार्च महिन्याचा शेवटच्या आठवड्यात लक्षेम्बोर्ग येथे भरलेल्या युवक शास्त्रज्ञ मेळाव्यात सहभागी होण्यासाठी रवाना झाले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी स्वतः या चमूचे नेतृत्व केले. या मेळाव्यात आलेले अनुभव प्रस्तुत लेखात विशद केले आहेत.

शुक्रवार दिनांक २३ मार्च रोजी आम्ही सगळे जण मुम्बई पॅरीस लक्षेम्बोर्ग असा प्रवास करून लक्षेम्बोर्गच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुपारी पोहोचलो. स्वतः कार्लो आम्हाला घ्यायला विमानतळावर आले होते. त्यांच्याच गाडीतून त्यांनी आम्हाला आमच्या निवासस्थानी नेले. आमच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था यूथ होस्टेलमध्ये केली होती. शहराच्या मध्यभागी निसर्गरम्य अशा परिसरात हे होस्टेल बांधलेले आहे. खोल्या ताब्यात मिळताच आम्ही विश्रांती घ्यायचे ठरविले. रात्रीच्या भोजनानंतर मात्र शहराचे दर्शन घडवून आणण्याचा आयोजकांचा बेत होता. शहर लहानसेच आहे; पण टुमदार आहे. शहराच्या मध्यभागीच फक्त उंच इमारती आढळतात. इतर ठिकाणी सुटसुटीत अशी लहानसहान घरे आहेत. शहरात सर्वत्र स्वच्छता आहे. युरोप खंडाला शोभेल अशीच शहराची रचना आहे.

डोळे कितीही छोटे असले तरीही त्यांत एका नजरेत सारं आकाश सामावण्याची ताकत असते.



**लक्षेम्बोर्ग शहराचे संध्याकाळचे दृश्य**

दुसऱ्या दिवशी सकाळीच नाश्ता आटोपल्याबरोबर आम्हाला प्रदर्शन स्थळी नेण्यात आले. वेगवेगळी प्रदर्शने भरवायला सोयीचे व्हावे यासाठी शहरात एक वैशिष्ट्य-पूर्ण अशी इमारत बांधण्यात आली आहे. तिचा आकार वर्तुळाकार असून दुरूनच ती आपल्या नजरेत भरते. त्या इमारतीच्या प्रवेशद्वारावर विज्ञान मेळाव्याचा मोठा फलक लावला होता. प्रदर्शन स्थळ अनेक मजली आहे. आम्ही प्रवेश करताना आम्हाला असे वाटले की, आम्ही तळमजल्यावर जात आहोत. प्रत्यक्षात मात्र तो तिसरा मजला होता. हा आणि त्यावरचा एक असे दोन मजले विज्ञान मेळाव्यासाठी राखून ठेवले होते.



**प्रदर्शन स्थळ**

एका मोठ्या सभागृहात प्रकल्प लावण्याची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक प्रकल्पासाठी आधीच जागा राखून ठेवण्यात आली होती. आम्ही आमची जागा शोधून प्रकल्पाची मांडणी करू लागलो. या कामी मदत करायला स्वयंसेवक होतेच. आमच्या प्रकल्पाच्या ठिकाणी वीजपुरवठा होत नाही हे कळल्याबरोबर त्यांनी धावपळ करून लगेच समस्येचे निराकरण केले. चिपळूणच्या मुलांनी आणलेला प्रकल्प साधाच होता, पण तेवढाच महत्त्वाचा होता. आजकाल जागोजागी मोठमोठ्या इमारती उभ्या राहात आहेत. अगदी चिपळूण गावात देखील अलीकडे अनेक सहकारी सोसायट्या उभ्या राहिलेल्या आहेत. या इमारतींतील प्रत्येकाला पाणी मिळावे यासाठी इमारतीवर पाण्याची टाकी बांधतात. नगरपालिकेचे पाणी या टाकीत साठवून ठेवले जाते. पाण्याचा दाब कमी असल्याने बऱ्याच ठिकाणी पाणी वर चढविण्यासाठी विजेची मोटर बसविलेली असते. ती एकदा चालू केली की चालूच राहाते. यात वीज आणि पाणी दोन्ही वाया जाते. वीज आणि पाणी टंचाईच्या या काळात या गोष्टी परवडण्यासारख्या नाहीत असे या दोन विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे वाटायचे. म्हणून त्यांच्या शिक्षकांच्या मदतीने त्यांनी एक असे उपकरण विकसित केले की, टाकीत ठरावीक उंचीपर्यंत पाणी आले की आपोआप विजपुरवठा खंडित होईल. हाच प्रकल्प घेऊन ते लक्षेम्बोर्गला आले होते. दिलेल्या वेळेत त्यांनी आपला प्रकल्प व्यवस्थितपणे लावून पूर्ण केला. सगळी यंत्रणा योग्य काम करते आहे ना याची खात्री करून घेतली.




**प्रदर्शन स्थळाच्या प्रवेशद्वाराजवळ भारतीय विद्यार्थी**

विज्ञान मेळाव्याचे आयोजन उत्तम पद्धतीने केले होते. प्रत्येक प्रकल्पाला पुरेशी जागा उपलब्ध करून दिलेली होती. त्याचबरोबर सगळ्यांच्या भोजनाची सोय प्रदर्शन स्थळीच केली होती. प्रकल्प लावून होईपर्यंत भोजनाची वेळ झालीच होती. आम्ही प्रत्येकाने जेवणाची पाकिटे घेऊन भोजन आटोपले आणि पुढील कार्यक्रमासाठी सज्ज झालो. आमच्याखेरीज आणखी आठ-दहा देशांची मंडळी प्रदर्शनासाठी आली होती. त्यांना शहराची माहिती व्हावी यासाठी दुपारी एक सहल आयोजित करण्यात आली होती. चालत चालत आम्ही एका बागेत पोहोचलो. या बागेला बरेच महत्त्व आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काही लढाया या बागेत झाल्या होत्या. त्यापासून बचाव करण्यासाठी मित्र राष्ट्रांनी तेथे खंदक खोदले होते. वरून फुलझाडे दिसत असली तरी त्याच्याखाली मात्र मोठे भुयार आहे असे आमच्या मार्गदर्शकाने आम्हाला सांगितले. केवळ सांगितलेच नाही तर ते प्रत्यक्ष दखविण्यासाठी ते आम्हाला घेऊन गेले. आम्हाला प्रत्येकाला एकेक टॉर्च आणायला त्यांनी आधी सांगितले होते. त्याप्रमाणे बहुतेकाने आपापले टॉर्च आणले होते. ज्यांनी आणले नाही त्यांच्यासाठी त्यांनी ज्यादा टॉर्चची व्यवस्था करून ठेवली होती. हातात छोटेखानी टॉर्च घेऊन आम्ही मार्गदर्शकाच्या सूचनेप्रमाणे भुयारात प्रवेश केला. पूर्वी तिथे गडद अंधार असायचा. परंतु आता पर्यटकांना वाट दिसावी यासाठी विजेचे दिवे लावले आहेत. काही ठिकाणी तर चक्क मेणबत्त्या पेटत ठेवल्या होत्या. त्याच्या मंद प्रकाशात वाट शोधत आम्ही भुयाराचे निरीक्षण करीत होतो. भुयारात अनेक ठिकाणी फ्रेंच आणि जर्मन भाषेत सूचना होत्या. साधारणपणे एका तासाने आम्ही पहिल्या भुयारातून बाहेर पडलो. त्यानंतर आमच्या मार्गदर्शकाने आम्हाला दुसऱ्या भुयारात नेले. हे आधीच्यापेक्षा आणखी मोठे होते, तेथून बाहेर पडायला सुमारे दीड तास लागला असेल. तोपर्यंत संध्याकाळ व्हायला आली होती.



बागेतील भुयाराचे प्रवेशद्वार



### भुयाराचे प्रत्यक्ष दर्शन

संध्याकाळी शहर दर्शनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. बागेच्या जवळच शहराचा मध्यभाग आहे. आम्ही पायी चालतच तेथे पोहोचलो. युरोपातील कोणत्याही शहरासारखेच हे शहर आहे. या देशावर जर्मन आणि फ्रेंचानी राज्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीच्या पाऊलखुणा आपल्याला या शहरात पाहायला मिळतात. त्यांची भाषदेखील जर्मन आणि फ्रेंच या दोन भाषांनी प्रभावित झालेली आहे. शहराच्या मध्यभागी सर्वत्र दगडाच्या इमारती आणि पुतळे आढळतात. रस्त्याच्या दोन्ही बाजुला दुकाने आणि उपहारगृहे आहेत. या परिसरात फिरण्यासाठी आम्हाला मुभा देण्यात आली होती. त्याचा उपयोग करून आम्ही जरा फेरफटका मारून आलो आणि बरेच फोटो घेतले. त्यातील काही पुढे दिलेले आहेत.



**एक लक्षवेधी सोनेरी पुतळा**



**आणखी एक लक्षवेधी पुतळा**



**एका पुतळ्यासमोर भारतीय चमू**

दिवस मावळायला आला तेव्हा त्यांनी आम्हाला तेथेच थांबायला सांगून विद्यार्थ्यांना मात्र दुसरीकडे घेऊन गेले. वेगवेगळ्या देशांतील मुलांची परस्परांशी चांगली ओळख व्हावी यासाठी त्यांनी त्यांच्यासाठी वेगळाच कार्यक्रम आखला होता. त्यामध्ये वेगवेगळे खेळ समाविष्ट होते. या खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जवळीक साधली जावी असा उद्देश होता. तो बऱ्याच अंशी साध्य झाला. त्यांच्या रात्रीच्या भोजनाची व्यवस्था देखील तिकडेच करण्यात आली होती. मोठ्या मंडळींच्या रात्रीच्या भोजनाची व्यवस्था मात्र शहरातच करण्यात आली होती. त्यासाठी एक चिनी भोजनालय निवडले होते. मी इकडेतिकडे बघत होतो पण मला भारतीय भोजनालय काही दिसले नाही. शहरात काही भारतीय भोजनालये आहेत असे आम्हाला सांगण्यात आले होते. भोजनानंतर आम्ही पायी चालतच यूथ होस्टेलमध्ये पोहोचलो.



**संधीप्रकाशाने उजळून निघालेली दगडाची इमारत**

म्हणता म्हणता प्रदर्शनाचा दिवस उजाडला. तो मार्च महिन्यातला शेवटचा रविवार असल्याने युरोप खंडासाठी खास दिवस होता. त्या दिवशी घड्याळ एका तासाने पुढे केले जाते. युरोप खंड विषुववृतापासून खूप

दूर असल्याने तेथे हिवाळ्यात दिवस खूपच लहान तर उन्हाळ्यात खूपच मोठा असतो. उन्हाळ्यात १६ ते १८ तास सूर्य आकाशात असतो. त्यामुळे सकाळ लवकर होते. या गोष्टीचा उपयोग करून घेण्याचे तेथील विचारवंतानी ठरविले. त्यानुसार, उन्हाळ्यात घड्याळ एका तासाने पुढे करण्याची प्रथा सुरू झाली. या प्रकारामुळे प्रत्यक्षात आठच वाजले असताना घड्याळात मात्र नऊ वाजलेले दिसतात. त्यामुळे लोक एक तास आधीच कामाला जातात. मार्च महिन्याच्या शेवटच्या रविवारी घड्याळ एका तासाने पुढे करावयाचे असते. ते घड्याळ तसेच सहा महिने राहते. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या रविवारी परत घड्याळ एका तासाने मागे केले जाते. हा शिरस्ता अनेक वर्षे चालू आहे. या शिरस्त्यानुसार आम्ही आपले घड्याळ लावून घेतले आणि नवीन वेळेनुसार ९ वाजता तयार झालो. लवकरच प्रदर्शनस्थळी आम्हाला नेण्यासाठी बस आली.



**यूथ होस्टेलची इमारत**

प्रदर्शनाच्या ठिकाणी पोहोचल्याबरोबर प्रत्येकाला आपापल्या जागेवर जायला सांगण्यात आले. प्रदर्शन पाहण्यासाठी शाळकरी विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने आले होते. त्यामुळे लवकरच प्रदर्शनस्थळ गजबजून गेले. प्रत्येकजण आपापल्या प्रकल्पाची माहिती देऊ लागला.

या प्रदर्शनात शहरातील शाळांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. याखेरीज रशिया, मोरोक्को,पोलंड, जर्मनी,



**भारतीय विद्यार्थी आपला प्रकल्प समजावून देताना**

फ्रान्स असे सुमारे दहा देश यात सहाभागी झाले होते. सगळेच प्रकल्प बघण्यासारखे होते. एकदा आमची मुले रुळली की मी देखील फेरफटका मारून आलो. प्रदर्शन पाहायला आलेले सानथोर सर्वचजण मन लावून प्रत्येक प्रकल्प समजावून घेत होते. विद्यार्थी प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपले म्हणणे त्यांना समजावून सांगत होते. त्यामध्ये एक भारतीय वंशाचा मुलगा देखील होता. तो त्याच शहरातील शाळेत शिकतो. त्याचे वडील तेथेच एका कंपनीत कामाला आहेत. त्यामुळे त्यांचे कुटुंब याच शहरात राहते. संध्याकाळी त्याच्या आईवडिलांची त्याने भेट करून दिली. त्यांच्याकडून समजले की, हा देश कोठल्याच राजकीय गटात नसून अलिप्त आहे. व्यवसाय करण्याचे नियम येथे उद्योगधंद्याना पोषक असेच आहेत. त्यामुळे येथे अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या आहेत. विशेष म्हणजे लक्षी मित्तल यांच्या पोलाद उद्योगाचे प्रमुख कार्यालय याच शहरात आहे.



**विज्ञान मेळाव्याचे दृश्य**

शब्द बोलताना शब्दाला धार नको तर आधार असला पाहिजे. कारण धार असलेले शब्द मन कापतात आणि आधार असलेले शब्द मन जिंकतात!

प्रकल्प सादरीकरणाचे काम दिवसभर चालू होते. मध्ये दुपारी जेवणासाठी अवकाश देण्यात आला होता. प्रत्येकाने आपल्या सोयीनुसार आपले पाकीट घेऊन जेवण आटोपून घ्यावे अशी सूचना आधीच दिली होती. संध्याकाळी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होता. त्यासाठी त्या देशाचे राजे आले होते. काही बडेजाव नाही की मोठा गोतावळा नाही. संपूर्ण कार्यक्रमाला ते हजर होते. परंतु त्यांनी भाषण देखील केले नाही. त्याऐवजी भाषण होते ते दोन तरुण संशोधकांचे. ही कल्पना मला फारच आवडली. सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचे संशोधनाचे अनुभव अगदी लक्षपूर्वक ऐकले.



**विद्यार्थांना मार्गदर्शन करणारी तरुण संशोधिका**

प्रदर्शनात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रशस्तीपत्रक देण्यात आले. याखेरीज वेगवेगळ्या ठिकाणी स्पर्धेसाठी पाठवावयाच्या प्रकल्पांची निवड जाहीर करण्यात आली. हा सर्व सोहळा अतिशय पद्धतशीरपणे संपन्न झाला. विशेष असे की, या सोहळयात बोलण्यासाठी म्हणून भारतीय प्रतिनिधीला पाचारण करण्यात आले. मी स्टेजवर जाऊन आयोजकांचे आभार मानले. त्याचबरोबर अशाच प्रकारची स्पर्धा आम्ही विशाखापटनम येथे आयोजित करतो तेथे येण्याचे निमंत्रण दिले. त्याचा युवक शास्त्रज्ञ समितीने स्वीकार केला. यातून नियमीतपणे येणे-जाणे सुरू होण्याची शक्यता वाढली आहे.



**प्रमाणपत्रप्राप्त आंतरराष्ट्रीय विद्यार्थी**

बक्षीस वितरण सोहळ्यानंतर चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्ताने वेगवेगळ्या देशांतील विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या शिक्षकांशी आम्हाला संपर्क साधता आला. एकूणच लक्षेम्बोर्गचा हा अनुभव चांगला होता. सहभागी झालेल्या दोन्ही मुलांसाठी तर ही मोठीच संधी होती. ते दोघेही पहिल्यांदाच परदेशात आले होते. परदेशातील लोकांसमोर आपला प्रकल्प त्यांनी आत्मविश्वासाने सादर केला. वेगवेगळ्या देशांतील मुलामुलींशी त्यांची या निमित्ताने ओळख झाली. ते एखाद्या समस्येकडे कसे बघतात याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना घेता आला. यातून त्यांचे जे शिक्षण झाले त्याचे मूल्यमापन करणे जवळजवळ अशक्यच आहे.



**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा,
वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

जेव्हा काही खास लोक आपल्याला दुर्लक्षित करत असतील, तेव्हा समजून जा की त्यांच्या सगळ्या गरजा पूर्ण झाल्या आहेत.


# स्वदेशवेध-०७ अविश्वसनीय भारतः मेवाड

**भाग : २**

*मेवाड सहलीचे वर्णन या लेखात विशद केले आहे - संपादक*

दिलवारा अचलगढ रस्त्यावर ३ किलोमीटर पासून एक ७ किलोमीटर लांबीची डांबरी सडक उंच पर्वतावरील गुरूशिखरापर्यंत घेऊन जाते. गुरूशिखर हे अरवली पर्वताचे सर्वोच्च शिखर आहे. त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची आहे १,७२२ मीटर (म्हणजेच ५,६७६ फूट), तर त्याचे ठिकाण माऊंट अबू पासून १५ किलोमीटर अंतरावर आहे. गुरूशिखरावर दत्तात्रेयाचे मंदिर आहे. मंदिरात दत्तात्रेयाची सुरेख मूर्ती आहे. इथेच एक भव्य, पुरातन, पितळी घंटा होती, जिच्यावर ख्रिस्तपूर्व १,४११ मधील कोरीव काम होते. आता मात्र तिच्या जागी नवी घंटा बसवलेली आहे. मंदिरापासून आणखी थोड्या उंचीवरील सर्वोच्च ठिकाणी चरण पादुकांचे एक छोटेसे मंदिर आहे. इथून सभोवतालचे विहंगम दृश्य पाहता येते. इथे वेगवान वारे सदासर्वकाळ वाहत असतात. गोरक्षनाथांनी म्हटलेच आहे की, 'पवन ही योग, पवन ही भोग, पवन ही हरे छत्तीसो रोग' इथल्या प्रवाही वाऱ्यांमुळे इथे कायमच आरोग्यदायी वातावरण निर्माण झालेले आहे.

गुरूशिखरावर वरच्या भागी दत्तात्रेयांच्या चरण पादुकांचे देऊळ आहे, तर खालच्या बाजूला दिसतंय ते आहे दत्तमंदिर. दुसऱ्या चित्रात वरच्या बाजूला एक शंखाकृती आणि खालच्या बाजूला एक भव्य खोबण



असलेला खडक गुरूमंदिराच्या वाटेवर उठून दिसतात. खालच्या चित्रपट्टीतील पहिले चित्र शंखाकृती खडकाचे आहे तर दुसरे खोबणीच्या खडकाचे. संपूर्ण छत असलेल्या, मात्र तळाशी सपाट बूडच नसलेल्या या खोबणी, राहण्यास गुहा म्हणून मुळीच वापरता येण्यायोग्य नाहीत. हा खोबण असलेला खडक, गुरूशिखराच्या वाटेवर सहजच नजरेत भरतो. याच चित्रपट्टीतील तिसऱ्या चित्रात दत्तात्रेयांच्या चरण पादुकांचे मंदिर दिसत आहे. मंदिरावर जे काही लिहिलेले दिसत आहे ते आहे, 'गुरू दत्तात्रेय की चरण पादुका। दर्शन करके घण्टा बजाये, मनोकामना पुरी होती है।' शेवटले चित्र आहे त्याच घंटेचे, जिचा उल्लेख चरण पादुकांच्या मंदिरावरल्या लिखाणात केलेला आहे.



मंदिराजवळ फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीने चालवलेली माऊंट अबू वेधशाळा आहे. या वेधशाळेत १.२ मीटर अवरक्त दुर्बीण आहे. इथे अवकाशीय वस्तूंच्या अवरक्त किरणांचे भूमीवरून निरीक्षण करण्याकरताची भारतातील पहिलीच प्रमुख सुविधा आहे. इथे उंचीवरच्या वातावरणाच्या विज्ञानाचा अभ्यास केला जातो (एरोनॉमी), ज्यात विघटन आणि मूलकीकरण महत्त्वाचे असते. या विषयावरचे अनेक प्रयोगही येथे केले जातात. http://www.prl.res.in/. या प्रयोगशाळेचा फोटो चरणपादुकांच्या मंदिराजवळून उत्तम प्रकारे काढता येतो.

---


माणूस सर्व विसरू शकतो फक्त ते क्षण सोडून, जेव्हा त्याला आपल्या माणसांची गरज होती आणि ते सोबत नव्हते.

## चितौडचा इतिहास

इसवी सनाच्या ७ व्या शतकात मौर्य घराण्याने चितौड वसवले. पौराणिक मेवाडी नाण्यांवर आढळणाऱ्या चित्रांगद मोरी यांचे नावावरून त्याचे नाव चित्रकूट असे ठेवलेले होते. बाप्पा रावल यांनी इसवी सन ७३४ मधे चितौड जिंकून घेतल्यावर त्यास मेवाडची राजधानी केले. त्यानंतर अकबराने १५६८ मधे जिंकून घेईपर्यंत चितौडच मेवाडची राजधानी राहिले. त्यानंतर मग मेवाडची राजधानी उदयपूरला हलवण्यात आली.

बाप्पा रावल यांच्या पश्चात त्यांच्याच गहलोत घराण्यातच सत्ता राहिली. इसवी सन १३०३ मधे दिल्लीच्या अल्लाउद्दिन खिलजी याने पद्मिनीकरता चित्तौडवर हल्ला केला. तत्कालीन राजे, रावल रतनसिंग युद्धात मारले गेले. त्यांची पत्नी पद्मिनी हिने जौहार केला. चित्तौडवर अल्लाउद्दिन खिलजीची सत्ता स्थापन झाली. इसवी सन १३२७ मधे गेहलोत घराण्यातीलच हमीरसिंग यांनी पुन्हा सत्ता परत मिळवली. हमीरसिंग यांचा जन्म ज्या शिसोदा गावात झाला होता, त्यावरून मग या राजघराण्यास 'शिसोदिया' असेही म्हणू लागले.

राणा हमीरसिंग यांचे पणतू महाराणा कुंभकर्ण ऊर्फ कुंभा १४३३ चे सुमारास गादीवर बसले. १४४२ मधे माळव्याचा सुलतान महमूद खिलजी याने चित्तौडगढवर आक्रमण करून मच्छिंद्रगढ, पाणगढ आणि चौमुखा ताब्यात घेतले. या अनिर्णायक लढाईत गुजरात व माळव्याच्या संयुक्त फौजांचा पराभव झाल्याने सुलतान मांडूस परतला. पुढे दहा वर्षेपर्यंत मग चित्तौडवर आक्रमण होऊ शकले नाही. या विजयाची आठवण म्हणून १४४८ मधे महाराणा कुंभा यांनी चित्तौडमधे एक विजयस्तंभ उभारण्यास सुरुवात केली. तो १४५८ मधे बांधून पूर्ण झाला. ३७ मीटर उंचीच्या या स्तंभास नऊ मजले असून १५७ पायऱ्या आहेत. दगडातून शिल्पे साकारून



सजवलेले, एकातून एक उमलणारे, शंखाप्रमाणे उलगडत जाणारे जिने आणि हवेशीर कलात्मक खिडक्यांनी विभूषित, भरभक्कम बांधणीच्या या स्तंभाचा सर्वात वरचा मजला तर शिल्पकलेने अप्रतिम सजलेला आहे. इसवी सनाच्या पंधराव्या शतकातील भारतीय तंत्रज्ञानाचे देदिप्यमान उदाहरण म्हणून या विजयस्तंभाचा उल्लेख अभिमानानेच करावा लागेल.

महाराणा कुंभा यांनी १४५८ पर्यंत राज्य केले. १४५८ मधे त्यांचेच पुत्र उदयसिंग (प्रथम) यांनी सत्तासंपादनार्थ त्यांचा वध केला. महाराणा कुंभांच्या कारकीर्दीत सर्वप्रकारच्या कलागुणांना ऊर्जितावस्था प्राप्त झाली. मेवाडमधील ८४ किल्ल्यांपैकी ३२ किल्ले बांधले गेले. यांच्यातच मेवाडमधील चित्तौडनंतरचा सर्वात अभेद्य किल्ला कुंभलमेर किंवा कुंभलगढचा समावेश होतो. महाराणा प्रताप यांचा जन्मही कुंभलगढचाच. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ शिवनेरी आहे. तसेच राजस्थानात महाराणा प्रतापांचे जन्मस्थळ कुंभलगढ आहे. कुंभलगढची तटबंदी ३६ किलोमीटर लांबीची आहे. चीनच्या भिंतीनंतर, जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब तटबंदी आहे ही. महाराणा कुंभांच्याच कारकीर्दीत राणकपूरचे त्रैलोक्य-दीपक जैन मंदिर, चित्तौडची कुंभास्वामी आणि आदिवर्ष तसेच शांतिनाथ जैन मंदिरे बांधली गेली. स्वतः महाराणा कुंभांनी संगीत-राजा, गीतगोविंदावरची रसिक-प्रिय ही टीका, सूडप्रबंध आणि कामराज-रतिसार या ग्रंथांचे लेखन केले आहे. त्यांच्याच कार्यकाळात विद्वान अत्रींनी चित्तौडच्या

---

कमीपणा घेणारे कधीच लहान अथवा चुकीचे नसतात, कारण कमीपणा घेण्यासाठी
खूप मोठे मन असावे लागते.

कीर्तीस्तंभाची प्रशस्ती लिहिली आणि कहना व्यास यांनी एकलिंग-महात्म्य लिहिले.

१५२८ मधे राणा संग्रामसिंग यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात त्यांचा सर्वात मोठा हयात असलेला मुलगा रतनसिंग राणा झाला. १५३१ मधे रतनसिंग मारला गेला व त्याचाच भाऊ विक्रमादित्यसिंग गादीवर बसला. विक्रमादित्याच्याच राज्यकाळात बहादूरशाहने चित्तौडवर कब्जा मिळवला. उदयसिंग यास सुरक्षेच्या कारणास्तव बुंदीस रवाना करण्यात आले. पुढे १५३७ मधे विक्रमादित्यास मारून बनवीर गादीवर बसला. तेव्हाच तो उदयसिंगासही मारणार होता. पण पन्नाधायने त्याचे जागी आपल्या चंदन नावाच्या मुलास बळी देऊन त्याचे प्राण वाचवले. पन्नाधाई स्वतः उदयसिंगासोबत कुंभलगढ इथे आश्रयार्थ जाऊन राहिली. कुंभलगढाचा तत्कालीन शास्ता आशाशाह व इतर सरदारांच्या मदतीने १५४० मधे बनवीरचा पराभव करून उदयसिंग राजा झाला.

त्यानंतर महाराणा उदयसिंग यांनी चित्तौडवर राज्य केले. ते राणा संग्रामसिंग व राणी कर्मवती यांचे चौथे पुत्र होते व त्यांचा जन्म झाला तेव्हा राणा संग्रामसिंग हयात नव्हते. मेवाडच्या राजघराण्यातील ते ५३ वे शासक होते. महाराणा उदयसिंगांनी राजपूत राज्यव्यवस्थेचे एकचालकानुवर्तित्व घातक ठरत असल्याचे जाणून जाणत्यांच्या सामूहिक प्रशासनास जन्म दिला. या राज्यव्यवस्थेचा उपयोग पुढे अकबराच्या आक्रमणाचे काळी झाला. तेव्हा सर्वांच्या सल्ल्याने उदयसिंग चित्तौड सोडून निघून गेले होते. तरीही चित्तौडने चार महिनेपर्यंत शर्थीची झुंज दिली. २५ फेब्रुवारी १५६८ रोजी पुन्हा एकदा चित्तौड पडले आणि सर्व स्त्रियांना पुन्हा एकदा जौहार करावा लागला. चित्तौड राज्य करण्यास सुरक्षित राहिलेले नाही हे पाहून महाराणा उदयसिंग यांनी उदयपूर शहराची निर्मिती केली. त्यांच्या पश्चात महाराणा उदयसिंगांनी आपल्या आवडत्या जगमल्ल नावाच्या पुत्रास राज्याची सूत्रे सुपूर्त केली. मात्र त्यांनीच घडवलेल्या सामूहिक प्रशासनास हे रुचले नाही. महाराणा प्रताप हे महाराणा उदयसिंगांचे थोरले पुत्र होते.



महाराणा प्रताप यांचा घोडा चेतक, याला हत्तीची खोटीच सोंड जोडलेली असे. हत्ती आपल्या पिल्लावर हल्ला करत नाही म्हणून हत्तीच्या हल्ल्यातून वाचण्याकरता या युक्तीचा उपयोग होत असे. मानसिंगाच्या हत्तीवर चेतक चाल करून गेला तेव्हा मात्र, मानसिंगाच्या हत्तीने, सोंडेत दिलेल्या तरवारीने चेतकाच्या मागल्या पायावर गंभीर हल्ला केला. हेच वरील चित्रपट्टीतील पहिल्या चित्रात दर्शवण्यात आलेले आहे. दुसऱ्या चित्रात महाराणा प्रताप यांचे सेनापती हकीमखान सूरी, आदिवासींचे राजे राणा पुंजा आणि महाराणा प्रताप यांचाच वेष घेऊन लढून शहीद झालेले झाला मान (हे महाराणा प्रताप यांच्या प्रमाणे दिसत होते म्हणून त्यांच्यामुळे महाराणांचा प्राण वाचू शकला होता.), हे महाराणा प्रताप यांचे तारक त्रिकूट दर्शवलेले आहे.

ते पराक्रमी आणि राज्यकर्ते म्हणून सर्वमान्य होते. म्हणून त्या सामूहिक प्रशासनाने त्यांस गादीवर बसवले. महाराणा प्रतापांनी अकबराच्या आक्रमणाविरुद्ध हल्दीघाटीत निकराची लढाई केली. मात्र त्यात त्यांचा पराभव झाला. त्यांचा आवडता घोडा चेतकही मारला गेला. महाराणा प्रताप वाचले. त्यांनी चित्तौड वगळता सारे मेवाड पुन्हा ताब्यात घेतले. चित्तौड ताब्यात येईपर्यंत सारे राजभोग सोडून दिले. पत्रावळीत जेवण्याची शपथ घेतली. पण अखेरपर्यंत ते चित्तौडवर ताबा मिळवू शकले नाहीत.

---

दुःखाने मला अजून सामर्थ्यवान बनवलं. भीतीने मला अजून शूर बनवले.
अपयशाने मला अजून महत्त्वाकांक्षी बनवले.

**हल्दीघाटी:** अशा तीव्र संघर्षाचा आणि प्रखर स्वाभिमानाचा इतिहास असलेल्या चित्तौडगढाकडे आम्ही आता अग्रसर होत होतो. मग जगप्रसिद्ध हल्दीघाटी लागली. खरोखरीच तिथे आजही हळदीसारखे खडक दिसून येतात. ही एक खूपच अरुंद खिंड आहे. जेमतेम एक वाहन जाऊ शकेल असा डांबरी रस्ता त्यातून पलीकडे घेऊन जातो. बाहेर पडल्यावर एक खासगी वस्तुसंग्रहालय आहे. त्यात हल्दीघाटीचा इतिहास शिल्परूपाने अंकित करण्यात आलेला आहे. एक ग्रंथालयही आहे. तसेच तत्कालीन चित्तौड साकार करणारे देखावेही आहेत. सोबतच स्थानिक पद्धतीच्या जेवणाचीही सोय आहे. तिथे आम्हाला दाल-चुर्मा, बाजरीची भाकरी-ताडाचा गूळ-साजुक तूप, छाछ इत्यादींसहित सुग्रास जेवण घेता आले.



वरील चित्रपट्टीत डाव्या बाजूची छत्री काळसर संगमरवराची बनवलेली असली तरीही धातूचीच वाटते. एवढे कौशल्य तिच्या घडणीत सामावलेले आहे. शिवाय इतक्या नाजूक, काटकुळ्या खांबांवर टनावारी वजनाची छत्री शतकानुशतके कशी तोलून धरली आहे हेही एक आश्चर्यच. उजव्या बाजूस दगडी हत्तीच्या सोंडेतून उसळणारे कारंजे दिसत आहे; तर त्याचे खाली पक्ष्याच्या चोचीतून कारंजाचे तोंड घडवलेले दिसत आहे.

**सहेलियों की बाडी:** हल्लीच्या स्वरूपातील 'सख्यांचे घर' बाग, फतेहसागर तलावाच्या बंधाऱ्याच्या पूर्वेस, महाराजा फतेहसिंग यांनी इसवी सन १८८८ मधे बांधला आहे. पूर्वी १६६८ मधे मिर्झाराजे जयसिंग यांनी जो मातीचा बंधारा इथे बांधलेला होता, तो २०० वर्षांनंतर वाहून गेल्यामुळे हा बंधारा महाराज फतेहसिंग यांना पुन्हा बांधून घ्यावा लागलेला होता. प्रफुल्लित कमळ पुष्करण्या, लांब-रूंद हिरवळींच्या विस्तीर्ण बागा, तऱ्हेतऱ्हेच्या रंगीबेरंगी फुलांचे ताटवे यांनी ही बाग सदा बहरलेली दिसते. पुष्करण्यांच्या तीरांवर चहुबाजूंना संगमरवरी हत्ती आपल्या वळवलेल्या सोंडांतून पुष्करणीतील कमळांवर कारंजी उडवत असतात. पक्ष्यांच्या चोचींतून, हत्तींच्या सोंडांतून आणि निरनिराळ्या सूप्त मुखांतून उत्साहाने उसळणारी कारंजी; फतेहसागर तलावाच्या बंधाऱ्यातून नैसर्गिक गुरूत्वीय शक्तीने संचालित केलेली आहेत.

त्या कारंजांना उडवण्याकरता पंप वापरलेले नाहीत. कारंजी इथे इतक्या मोठ्या संख्येने आहेत की या बागेस 'कारंजांचा बाग' असेही म्हटले जाते. या कारंजांच्या तुषारांनी सारी बागच भारीत झालेली असते. पर्यटकास परी-राज्यातच फेरफटका करतो आहोत असा आभास होतो. अनेक चित्रपटांचे चित्रीकरण इथेच झाल्याचे मार्गदर्शक सांगतात. इथेच पारंपरिक राजस्थानी पेहरावात फोटो काढून घेण्याचीही सोय आहे. इथले सारे वातावरणच भारून टाकणारे, अविस्मरणीय आणि आनंदित करणारे आहे.



प्रत्येक माणसाची गोष्ट मनावर घेऊ नका. कारण माणसे तुम्हाला काय बोलतात त्यावरून त्यांची पात्रता कळते; तुमची नाही.

या चित्रपट्टीत वरच्या बाजूला प्रवेशद्वारावरील संगमरवरी हत्ती, दारावरले स्फटिकतुरे, ऋतूनिदर्शक सज्जासजावट दिसत असून खालच्या बाजूला लाकडी चौकटीच्या सजावटीचे दार, काचा जडवलेली सालंकृत भिंत आणि रत्नजडित कलाकुसरीने घडवलेले मोराचे चित्र दिसत आहे.

फतेहसागर तलावात तीन बेटे आहेत. चार वर्ग किलोमीटर क्षेत्रफळाच्या मोठ्या बेटावर नेहरूपार्क आहे. त्यावर लोकप्रिय उद्यान, उपाहारगृह तसेच प्राणीसंग्रहालयही आहे. तिथे जाण्याकरता मोतीमगरीच्या पायथ्यापासून मोटार बोटींची सोय आहे. दुसऱ्या ०.०६ वर्ग किलोमीटर क्षेत्रफळाच्या लहान बेटावर सार्वजनिक उद्यान आहे. तिसऱ्या १.२ वर्ग किलोमीटर क्षेत्रफळाच्या बेटावर उदयपूर सौर वेधशाळा (Udaipur Solar Observatory-USO) वसवलेली आहे.

**नगरमहाल (सिटी पॅलेस):** उदयपूर नगर, महाराज उदयसिंगांनी वसवले. चित्तौड अकबराचे हाती गेल्यानंतर मेवाडची राजधानी उदयपूरच राहिली. या नात्याने इथे राजमहाल असणे साहजिकच आहे. मात्र मी भारतात इतरत्र पाहिलेल्या राजप्रासादांच्या मानाने उदयपूरचा राजप्रासाद भव्य, दिव्य आणि वैभवशाली ठरला. इथल्या राजवाड्याचे वैशिष्ट्य म्हणजे इथली कलाकुसरींनी नटलेली दालने आणि इथली भव्यता.

स्फटिकसज्जा (crystal galary) हे इथले आणखी एक आकर्षण. राजवाड्याच्या फतेह पोल मधून बाहेर पडल्यावर समोरच्या तलावात दिसणारा जलमहालही इथले आकर्षणच ठरावा. प्रथम आम्ही वरच्या मजल्यापर्यंत फिरून राजवाडा पाहिला. तिथे एका दर्शनीय प्रवेशद्वारावर बसवलेले स्फटिकतुरे सोन्यासारखे पिवळेधमक झळकत होते.

राजप्रासादाच्या भिंती काचा व निरनिराळ्या रंगछटांचे दगड जडवून सुशोभित केलेल्या होत्या. कित्येक ठिकाणी तर त्या त्या दालनाची प्रवेशद्वारे ऋतुमानानुसार रंगछटांनी सजवण्याकरता विशिष्ट रंगाच्या संगमरवराचा सुबकतेने वापर दिसत होता. काचा जडवून तयार केलेले मोर तर अद्वितीयच होते. शुभ्र संगमरवराचे सुंदर हत्ती प्रवेशद्वाराशी झुलत होते.




उदयपूरच्या नगरप्रासादातील दरबार दालन. इथेच आमचे चहापान झाले. नंतर श्राव्यसहल यंत्र सोबत घेऊन आम्ही दरबार दालन तसेच स्फटिक सज्जेची (क्रिस्टल गॅलरीची) प्रदक्षिणा केली.

दरम्यान दरबार दालनात आमचे चहापानाने स्वागत करण्यात आले. मात्र इथे कॅमेरा नेण्यास परवानगी नसल्याने चित्रे दाखवता येणार नाहीत. त्यांच्याच माहितीपत्रकावरचे एक चित्र इथे देत आहे. त्यावरून दरबार दालनाची कल्पना करता येईल. दालनाच्या भवताली पत्रकारसज्जा असते तशी दीर्घा, पहिल्या मजल्यावर होती.

तिच्या प्रदक्षिणामार्गात जागोजाग स्फटिककाचेची तसेच पैलू पाडलेल्या काचेची (कट ग्लास) विविध भांडी (चहापानाची भांडी, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, हळदीकुंकवाची भांडी, कप, बशा, पेले, दारूचे प्याले, बाटल्या इत्यादी अनेकविध वस्तू), उपकरणे, बैठकीचे सामान (मेज, खुर्च्या, घडवंच्या, दिवाण, चौरंग, पाट, पायदाने, तिवया व इतर अनेक ज्यांची नावेही आठवत नाहीत) अशा नानाविध वस्तू काचेच्या कपाटांतून बैजवार मांडून प्रदर्शित केलेल्या होत्या. त्या त्या जागांवर लिहिलेले क्रमांक आपापल्या श्राव्य उपकरणांच्या

कळांवर दाबले असता कानाला लावलेल्या श्रवणसंचातून त्या त्या विभागाची माहिती इंग्रजीतून ऐकू येण्याची सोय होती. आजूबाजूच्या ऐश्वर्याने दिपून जात आणि भवतालच्या गर्भश्रीमंती थाटाने भारावून जातच आम्ही तिथून बाहेर पडलो.



**उदयपूरचा जलमहाल :** याचेबाबत इतकेच सांगता येईल की याची वर्णने करतांना मार्गदर्शक थकत नाहीत, कित्येक चित्रपटांची चित्रीकरणे इथेच झालेली आहेत, आणि श्रीमंतातले श्रीमंत चित्रपट अभिनेते, अभिनेत्या इथे राहण्यास कायमच उत्सुक असतात.

बाहेर संध्याकाळ व्हायला आलेली होती. जलमहालावर संध्याकाळचे ऊन पडून अवर्णनीय शोभा उदयास आलेली होती. आता आमच्या हातात आमचे कॅमेरेही आलेले होते. मग काय विचारता. आतापर्यंत दाबून ठेवलेली प्रकाशचित्रणाची हौस प्रत्येकाने असंख्य चित्रे काढूनच भागवून घेतली. तर कित्येकांनी मनःपूत चलतचित्रणही करून घेतले.



**विजयस्तंभाच्या सर्वोच्च कक्षातील छतावरील नेत्रदीपक कलाकुसर**

आमच्या साऱ्या एकवीस प्रवाशांपैकी सारेच्या सारेच अतिशय वक्तशीर असल्यामुळे कधी कुणामुळे पाच मिनिटे उशीर झाला असे झालेच नाही. हे एक सुखद आश्चर्य होते. याचकरता आमचा हा गट आमच्याकरता अविस्मरणीय ठरला आहे. शिवाय उत्साहही एवढा की प्रत्येकजण गुरूशिखरावरही चढून गेलेला होता. इथे हेही नमूद करणे गरजेचे आहे की विशीतले फक्त तीन जण होते. इतर सर्व पन्नाशी–साठीच्या घरातले.

सकाळीच बाहेर पडून आम्ही चित्तौडगढाची वाट चालू लागलो. चित्तौडगढला पोहोचल्यावर हॉटेल मीरामधे आम्ही ताजेतवाने झालो. तिथे पोहोचून सहा सीटर रिक्षा केल्या. कारण बसला चित्तौडगढात फिरण्याची परवानगी नव्हती. या रिक्षा आपल्याकडच्या तीन सीटर रिक्षांप्रमाणेच असून आपल्याकडे जी सामानाकरता जागा असते ती पाठीमागून उघडी ठेवून पाठीकडे तोंड करून बसण्याची आणखी तीन व्यक्तींची सोय केलेली असते. चित्तौडगढात अशाच रिक्षा सर्वत्र फिरतांना दिसत होत्या. सर्वात प्रथम आम्ही कुंभा महालाकडे गेलो. त्याच्या ओवरीतच मार्गदर्शकाने इथल्या भागाचा इतिहास सांगितला. राणा कुंभा हे सूर्यवंशी होते. सूर्योदय पाहण्याची त्यांची प्रथा होती. याकरता खास जागा तयार केलेली असे. तिला सूरज–गोखरा म्हणत. ओवरीतूनच तो कुंभा महालचा सूरज गोखरा दिसत होता. मग दिसला तो कुंभा महालाचा चबुतरा. इथून खाली गावाकडे जाण्याकरता भुयार आहे, असे मार्गदर्शक सांगत होता. आता मात्र ते बंद करून ठेवलेले आहे. त्यानंतर आम्ही पट्टा हवेली पाहिली. वाटेत एका जागी एक कमळपुष्पासारखा घडवलेला दगड दिसला. तो बहुधा कुठल्याशा पुष्करणीतील कारंजाकरता घडवलेला कारंजमुखाचा दगड असावा. इथेच आम्हाला एक मुंगूस ऐटीत फिरताना दिसले होते.

मग पुन्हा रिक्षांमधे बसून आम्ही विजयस्तंभाकडे गेलो. इथेच सतीचे मैदान दिसले जिथे इतिहासकाळात तीन वेळा जौहार करण्यात आलेला होता. गोमुखातून शिवास अभिषेक होतो ते मंदिर. त्याचे शेजारचा जलाशय, चित्तौडगढाची तटबंदी इत्यादी पाहून मग आम्ही विजयस्तंभावर चढून गेलो. स्तंभावरून संपूर्ण चित्तौडगढाचे विहंगम दृश्य नजरेत येते.

नंतर पुन्हा एकदा रिक्षात बसून आम्ही पोहोचलो पद्मिनी महालाजवळ. तिथल्या एका महालाच्या प्रवेशद्वारावरही स्फटिकतुरा बसवलेला दिसला. हा मात्र काचेसारखाच पारदर्शक दिसत होता. तिथला राजप्रासाद पाहिला. मार्गदर्शकाने, अल्लाऊद्दीन खिलजीला पद्मिनीचे दर्शन आरशातून कसे घडवण्यात आले त्याचे कृतीसह निरूपण केले.

अखेरीस रिक्षात बसून आम्ही कुंभास्वामी मंदिराच्या प्रवेशद्वाराशी पोहोचलो. या संकुलात दोन मंदिरे आहेत. मीराबाईंचे आणि कुंभास्वामींचे. मीराबाईंच्या मंदिरासमोर मीराबाईंच्या गुरूंचे स्मारक बांधलेले आहे. समोरच मीराबाईंचे मंदिर आहे. मीराबाईंची मूर्ती छान सजवून ठेवलेली दिसत होती. कुंभास्वामी मंदिराच्या डाव्या भिंतीवरची गणेशाची मूर्ती छान दिसत होती, तिचा फोटो काढला. कुंभास्वामी मंदिरासमोर गरुडाची मूर्ती आहे, ती बघितली. कुंभास्वामी मंदिराचे विशाल स्तंभ पाहात मग आत शिरलो.



पुष्करचे आमचे हॉटेल मास्टर्स पॅराडाईज कलाकुसरीने परिपूर्ण होते. ब्रह्मदेवाच्या मंदिरात कॅमेरा नेता येत नसल्याने, आम्ही पुष्करला काढलेल्या फोटोंपैकी बहुतेक फोटो या हॉटेलातीलच आहेत. तिथे तरण तलाव होता. कलापूर्ण बैठका, दिवे, स्तंभ, शिल्पे इत्यादींनी सजवलेले, हिरव्यागार हिरवळींनी परिपूर्ण असे उद्यान होते. आवळे, पपयांनी लगडलेली झाडे होती. सकाळी उठून फेरफटका करताना आवळ्यांच्या झाडांखाली हिरव्या-पोपटी, ताज्या आवळ्यांचा सडाच पडलेला होता. आवळे खाण्याची परवानगी विचारल्यावर, हवे तेवढे आवळे घ्या असे सांगण्यात आले होते. म्हणून प्रत्येकाने शक्य तेवढे आवळे चाखले, जमतील तेवढे सोबत घेतले. तरीही जमिनीवर सडा पडलेला दिसतच होता. धन्य ते आवळे आणि धन्य त्या बागेचे करविते. माळीकाका सर्वप्रकारची फुले खुडून हार तयार करत बसलेले होते. दवबिंदूंनी ओल्या झालेल्या हिरवळीवर मोठमोठी कासवे मजेत विहरत होती. वातावरणात प्रसन्नता कशी आणता येते याचा जणू जिताजागता वस्तुपाठच होता तो. मी अनेक हॉटेलांत आजवर राहिलेलो आहे, तरीही बाहेर पडताना तुमचे हॉटेल चांगले आहे हो! असा अभिप्राय व्यक्त करण्यापासून मी स्वतःला रोखू शकलो नाही.



या चित्रात हॉटेलातील खोलीच्या भिंतीवरील सळईच्या जोडकामातून घडवलेली युवती, आवळ्यांनी

लगडलेले झाड, दगडातून कोरून तयार केलेला बाक आणि हिरवळीवर विहरणारे कासव दिसत आहे.

नंतर आम्ही पुष्कर सरोवरावर गेलो. मात्र पुष्कर तलावात पाणीच नव्हते. साफसफाईचे काम सुरू असल्याने पाणी दूरवर अडवून ठेवलेले होते. जे.सी.बी. यंत्रे दगड-माती-गाळाची उठाठेव करत होती. आम्हाला वेळ कमी असल्याने पुष्कर सरोवराच्या पाण्यात डुबकी घेणे, किमान पाय बुडवणे हे काही साधले नाही. मग आम्ही ब्रह्मदेवाच्या मंदिरात गेलो. दर्शन घेतले. उंटगाड्या बघितल्या. उंट पाहिले. उंटावर बसून घेतले. उंटांच्या कातड्याच्या जूती, मोजड्या पाहिल्या, विकत घेतल्या. आज रणथंभोरपर्यंतचा मोठा प्रवास करायचा असल्याने मग आम्ही बसमधे बसून रणथंभोरकडे कूच केले.

रणथंभोरला पोहोचता पोहोचता रात्र झाली. आम्ही हमीर रिसॉर्ट ह्या प्रसिद्ध हॉटेलात उतरलेलो होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी रणथंभोरच्या अभयारण्यात कँटरने फेरफटका करायचा असल्याने आज लवकरच निजायला लागणार होते.

सकाळी सकाळी उठून तयार होऊन आम्ही सगळे बाहेर उभे होतो. मग वीस सीटर कँटर गाड्या आल्या. स्थानापन्न होऊन आम्ही अभयारण्याकडे निघालो. दवबिंदूंनी ओलसर झालेले गवत, धूसर प्राचीतून अलगद डोकावत असणारे सूर्यबिंब, मंद गार वारा अशा उत्साहवर्धक वातावरणात कॅमेरे सज्ज करून आम्ही हळूहळू अरण्यात शिरलो. समोरच रणथंभोरचा किल्ला सारखा दर्शन देत होता. तो चढून जाणे सहलीत अंतर्भूत असायला हवे होते असे वाटू लागले. खूप मज्जा आली असती. असो. सध्यातरी त्याच्या सान्निध्यातूनच आम्ही वाट चालत होतो. अचानक हिरवळीत, झाडाझुडूपांत मोर दिसू लागले. झाडावर बसलेले एक घुबडही दिसले. एका नैसर्गिक जलाशयाच्या तीरावर उगवत्या हिवाळ्याची प्रसन्न सकाळ अलगद अवतरत होती. इथे नक्कीच काहीतरी पाहायला मिळणार म्हणून कँटर थांबले. मार्गदर्शकाने हातावर बिस्किटाचे तुकडे धरले. आणि काय आश्चर्य, सोनचिडिया म्हणून ओळखला जाणारा एक कावळ्याहून किंचित लहान आकाराचा दिमाखदार पक्षी हातावर बसून ते तुकडे टिपू लागला. त्याच सोनचिडीयाचा हा फोटो.

सारे दृश्यच भारलेले होते. सकाळच्या अरण्यातले



तऱ्हेतऱ्हेचे आवाज, किलबिल, अनोखी वातावरणनिर्मिती करत होते. आम्ही पुढे निघालो. वाघ दिसेल अशी अपेक्षा होती. मात्र वाघ दिसला नाही. काळतोंडी माकडे भरपूर दिसली. तसेच अस्ताव्यस्त पसरलेले वटवृक्षही इतस्ततः विखुरलेले दिसत होते. आतापर्यंत पाहिलेल्या मेवाडातील भूमीवर एवढे विशालकाय वृक्षच आम्ही बघितलेले नव्हते. इथे मात्र भव्य वडाची झाडे सर्वत्र दिसून येत होती.

नंतर जयपूर दर्शनचा कार्यक्रम होता. मात्र दिशाच्या फेब्रुवारी २०१६ च्या अंकात, 'मी पाहिलेले जयपूर' ह्या लेखात मी आधीच त्याचे वर्णन केलेले असल्याने इथे त्याची पुनरुक्ती करण्याचे काहीच प्रयोजन नाही.

**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं, तर आपली झोप उडवतं तेच खरं स्वप्न असतं. - डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

# ओळख वनस्पतींची
## गिरीपुष्प

*'गिरीपुष्प' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, पाहुणा आला आणि घरचाच झाला ही म्हण सार्थ करणारी बरीचशी झाडे आपल्याकडे आहेत. काही मुद्दामहून आणलेली अन् काही दळणवळणाच्या माध्यमातून बीयांच्या रुपातून झालेली. यामध्ये काही अत्यंत उपद्रवकारी आहेत. बेशरम, काँग्रेस गवत, जलपर्णी या सारख्या वनस्पती येथे अत्यंत जोमाने वाढताहेत. त्यांचा उपयोग करण्याचे ज्ञान येथील सजिवाला नाही. तसेच, कोणत्याही नियंत्रणाविना वाढणाऱ्या या वनस्पतींनी विविध ठिकाणच्या मोकळ्या जागा तशा पाणवठे गिळंकृत केले आहेत, त्यामुळे या वनस्पती नकोशा झाल्या आहेत.



हौस म्हणून आणलेल्या आणि येथे मोठ्या प्रमाणात प्रसार झालेली तरीही हवीहवीशी वाटणारी देखील काही झाडे आहेत. त्यातीलच एक आहे गिरीपुष्प. हे एक मध्यम उंचीचे झाड आहे. मूळचे मध्य अमेरिकेमधील हे झाड शंभर सव्वासे वर्षांपूर्वी हौस म्हणून भारतात आणले गेले आणि आपल्या अंगभूत गुणांमुळे ते भारतीयांचे लाडके झाले. याचे शास्त्रीय नाव आहे Griricidia Sepium. याच्या बिया या उंदारांसाठी विष म्हणून वापरत. म्हणून याला उंदीरमारी असे देखील नाव प्रचलित आहे. हे झाड डोंगरावर किंवा डोंगर उतारावर कुठेही वाढू शकते. डोंगरावर वाढणारे म्हणून गिरीपुष्प वा जिथे इतर झाडे टिकून राहू शकत नाही तिथे हे टिकून राहते. जमिनीची धूप थांबविण्यासाठी मोठ्याप्रमाणात याचा उपयोग होतो. भारतात बऱ्याच ठिकाणी डोंगर उतारावर याची लागवड केलेली दिसते.

याची उंची ११ मीटर पर्यंत वाढते. वाढ फारच जलद आहे. जमिनीपासून एक मीटर वा त्यापेक्षा कमी अंतरावरून फांद्या फुटतात. या झाडाच्या सालीचा रंग पांढरा भूरकट तर फांद्यांना लाल तपकिरी रंगाची छटा असते. पाने संयुक्त साधारण ३० सें. मी. लांबीची अन् पर्णिका ७ ते ८ सें. मी. लांब अन् २ सें. मी. ते ३ सें. मी. रुंदीच्या हिरवटपोपटी अन् खालच्या बाजूस बारीक ठिपके असणाऱ्या. असेच पांढूरके ठिपके फांद्यांवर देखील असतात. जानेवारी, फेब्रुवारीमध्ये झाडाची सर्व पाने गळून गेल्यावर खराट्यासारख्या आकृत्यांवर बारीक बारीक हिरव्या कळ्या डोलावू लागतात. अन् थोड्याच दिवसात कळ्या मोठ्या होऊन निष्पर्ण फांद्यांवर गुलाबी फुलांचे सुंदर झुबके दिसू लागतात या फुलांची रचना देखील आकर्षक असते. ३ सें. मी. लांबीच्या गुलाबी पायमोज्या सारख्या कळ्या बुडाशी तपकिरी लालसर रंगाच्या १ सें. मी. लांबीच्या वेष्टनाने

---

प्रत्येकाच्या आयुष्यात अशी वेळ नक्की येते, जिथे कोणाच्या सल्ल्याची नव्हे तर, कोणाच्या तरी सोबतीची गरज असते.

वेढलेल्या असतात. या कळ्या फुलतांना मुख्य पाकळी बाहेर पसरून मागे वळते. तिच्या दोन्ही बाह्य कडा पांढऱ्या गुलाबी असून मध्यावर पिवळ्या रंगाचा शिडकावा केलेला असतो. दुसऱ्या बाजूला दोन गुलाबी पाकळ्या दोन बाजूंना विलग झालेल्या. यामध्ये पुंकेसर येऊन छत्रीच्या दांडीसारखा विसावलेला. या फुलांना वास मात्र नाही. तरीही मोहक रंगसंगतीमुळे वासाची कमतरता लक्षातही येत नाही. हा सुंदर बहर अगदी एप्रिलपर्यंत कायम असतो. नंतर झाडावर ६ ते ८ सें. मी लांबीच्या हिरव्या शेंगा दिसू लागतात अन् त्याचवेळी पानांचीही गर्दी झाडावर दिसून येते. थोड्याच दिवसात परिसर हिरव्या रंगाने भरून जातो. शेंगा वाळल्यानंतर पिवळ्या होतात व तडकून बिया सर्वत्र पसरतात.

या झाडाची लागवड बियांपासून करता येतेच, पण नुसती फांदी तोडून लावली, तरी लगेच जीव धरते. जमिनीत थोडा ओलावा मात्र हवा. एकदा लावले की भरभर वाढते. त्यामुळे परिसर हिरवागार करण्याच्या नादात याची नको इतकी लागवड झालेली दिसते. कधी कुंपण म्हणून मुख्य झाडाच्याभोवती लावलेली झाडे जलद वाढून मुख्य झाडापेक्षाही अधिक लक्ष वेधून घेतात. नुसतेच सुंदर व भराभर वाढणारे म्हणून नाही; तर जमिनीला भरपूर पोषक द्रव्ये पुरविणारे उपयुक्त झाड म्हणूनही याची लागवड केली जाते. याच्या पानांमधे भरपूर नत्र असल्याने हिरवे खत म्हणून याच्या फांद्या जमिनीत पुरतात. त्यामुळे इतर रासायनिक खते देण्याची गरज भासत नाही. याचा पाला जनावरांना खाऊ घालतात; पण मुख्य उपयोग होतो तो हरीत खते करण्यासाठीच. जमिनीची धूप थांबविण्यासाठी देखील याची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात येते.

या झाडाचे वाळलेले लाकूड मंदगतीने जळत असल्याने सर्पण म्हणून देखील ग्रामीण भागात चांगले लोकप्रिय आहे. हल्ली बहुतेक शेतांमध्ये बांधावर गिरीपुष्पाची लागवड केलेली दिसते. या झाडाचा प्रसार भारतीय उपखंडात सर्वत्र झाला आहे. तसेच इंडोनेशिया आयलँड, मलेशिया इत्यादी देशांमध्येही झाला आहे.

मुळात हे झाड बाहेरील असल्याने बाहेरून आणलेल्या इतर झाडांप्रमाणे या झाडांपासून काही तोटेही दृष्टीस येत आहेत. याच्या वाढीवर नियंत्रण न ठेवल्यास येथील मूळ झाडांना ते हानीकारक ठरू शकते. तसेच, या झाडामुळे मिलीबग (पांढरामावा) सारखे कीटक जास्त आकर्षित होतात व ते इतर पिकांसाठी हानीकारक आहेत. तरीही एक शोभेचे झाड म्हणून, इतर झाडांसाठी आधार म्हणून, कुंपणासाठी म्हणून याचे महत्त्व आहेच. याच्या पानांपासून तयार केलेली पेस्ट जनावरांच्या अंगावरील कीटक मारण्यासाठी देखील वापरतात. मात्र औषधी उपयोग फारसे ज्ञात नाहीत.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

मोठेपणा हा तो गुण आहे, जो पदाने नाही तर संस्काराने प्राप्त होतो.

# देणाऱ्याने देत जावे

– वेंकट क्रिश्नन् एन्.

*कोणत्याही संदर्भात, एखाद्याने काहीही चांगले देऊ केले अथवा दिले तरीही घेणाऱ्याने मात्र विशिष्ट मर्यादेतच देणाऱ्याकडून ते घेतले पाहिजे. कारण देणारी व्यक्ती ही विशिष्ट उद्देशानेच ते देत असतो– संपादक*

जगाला बदलण्याचं स्वप्न जगा. पण सर्वप्रथम तुम्ही तुमच्या कुटुंबाची काळजी घेतली पाहिजे. तुम्ही कुठून सुरुवात करता? नवीन वर्षाची चाहूल लागताच तुम्ही तुमच्या संकल्पांबद्दल पुन्हा एकदा विचार करायला लागता. विचार करा; जर तुम्हाला कोणाचे आयुष्य बदलता आले तर? तुम्हाला भविष्याबद्दल चिंता करावी लागली नाही तर? स्वतःला अशा कामात बुडवता आलं ज्यातून तुम्हाला आयुष्यात आपण काहीतरी 'दिल्याचा' आनंद मिळेल तर? असे बरेच लोक आहेत ज्यांनी वर्तमानस्थिती टिकवण्यासाठी आणि भविष्यातील पैशांच्या चिंतेपोटी आपली पावले या दिशेने टाकण्यापासून रोखली. दुसऱ्यांना मदत करण्याआधी आपल्यासाठी पुरेसं आहे का, या विचाराने त्यांनी हे कायम पुढे ढकललं.

तुम्हाला माहिती आहेच, आपल्या विसाव्या वर्षी काय चालू व्हायचं. बिल भरण्याच्या गरजेपासून चालू होऊन ते एखादं घर आणि गाडी घेण्याच्या इच्छेपर्यंत आणि मग कौटुंबिक जीवनाचे स्वप्न. आपण मानवजातीमध्ये सामील होतो. कारण आपल्या मुलांसाठी भपकेदार शाळा पाहिजे असते आणि आपल्या आजूबाजूचा आढावा घेत आपण आपली ध्येयं ठरवत जातो. सुट्ट्यांचा काळ परदेशी घालवणं, भपकेदार उपकरणं वापरणं. आपण कोण आहोत यापेक्षा आपल्याकडे काय आहे अशी आपली जीवन पद्धती बनली जाते.

आपली मर्यादा आपण कशी ठरवतो? ती कक्षा कशी तयार होते? किती पुरेसं आहे हे कसं ठरवलं जातं? खरे पाहता, सर्वात पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे प्रश्न विचारणं आहे. पैसे किती अमूल्य आहेत या गोष्टीला आपण अवास्तव महत्त्व देतो.

हे प्रश्न विचारणं फार महत्त्वाचं आहे. आर्थिक नियोजन करण्यासाठी याची अत्यंत मदत होते, जिथे तुम्ही तुम्हाला लागतील अशा सर्व गरजा समाविष्ट करता. संभाव्य आकस्मिक खर्चसुद्धा. महागाईचे अंदाजपत्रसुद्धा विचारात घ्या. फक्त जगण्याच्या किंमतीत ५ ते ६ टक्के वाढ नाही. तर त्याशिवाय जीवनपद्धतीतील सुधारणांमध्ये ४ ते ५% वाढ, ज्याबद्दल तुम्ही आता काहीच सांगू शकत नाही. हे शोधा की, तुम्ही कुठे आहात, तुम्हाला अजून गरजा भासणार आहेत का, की आता तुम्ही तुमचं स्वप्न गाठायला तुमची ऊर्जा आणि वेळ केंद्रित करू शकता. जसं माझ्या दोन मित्रांनी केलं.

ही २००२ ची गोष्ट आहे. भारतातल्या मोठ्या बहुराष्ट्रीय बँकेतील देश व्यवस्थापक उज्ज्वल ठकर याला त्याच्या मूळ कंपनीकडून असे सांगण्यात आले की, ३०० हून जास्त नवीन जॉब ऑफर्स रद्द करण्याची गरज आहे. 'हे खरंच ते आहे का, जे मला माझ्या आयुष्यात करायचंय?' त्याने स्वतःलाच विचारलं. वयाच्या ५२ व्या वर्षी, उज्ज्वलची मुले स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभी आहेत आणि स्वतःला घर घेण्यासाठी पुरेशी बचत त्याने केलेली होती. पण जीवनात काहीतरी 'देण्याचा' आनंद घेण्याची उत्सुकता होती.

---

जीवनात वेळ कशीही असो. वाईट किंवा चांगली ती नक्कीच बदलते. पण चांगल्या वेळेत वाईट काम करू नका, जेणे करून वाईट वेळेत लोक सोडून जातील.

भारतातील सर्वात मोठ्या एन्.जी.ओं पैकी एक 'प्रथम' याचे नेतृत्व करण्याच्या पद्धतीने त्याला ही संधी मिळाली. त्याने ताबडतोब त्याच्या पत्नीशी संवाद साधला व त्याने असा निष्कर्ष निघाला की, जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी महिन्याला ५०,००० रु. (बँकेतील पगाराच्या १०% कमी) त्यांना पुरेसे होते. आणि मग उज्ज्वलने मोठ्या कंपनीतील आपली नोकरी सोडायची असे ठरवले. सहा वर्षे 'प्रथम'चे नेतृत्व करण्यासाठी आणि त्यानंतर निवृत्त होण्याआधी २ वर्षे 'Give India' मध्ये सी.ई.ओ. म्हणून काम करण्यासाठी तो निघाला. मागील १० वर्षे त्याने तरुण सामाजिक उद्योजकांना मार्गदर्शक म्हणून काम केले आहे.

आयुष्यात मागे वळून पाहताना उज्ज्वल म्हणतो, त्याने जीवनात घेतलेला तो सर्वात उत्तम निर्णय होता. ''खात्री करा की, तुमचा गणिताचा पाया तरी भक्कम आहे. सुनिश्चित करा की, सध्या चालू असलेलं तुमचं राहणीमान तुम्ही कायम ठेवू शकता आणि तुमच्या कुटुंबाला लागणारा खर्च तुम्ही करू शकता. पण याचा जास्त विचार करू नका. जर तुम्हाला मनापासून अगदी आतून बरं वाटत असेल, तर घ्या एक उंच भरारी आणि तुम्हाला आकाश ठेंगणं आहे'' तो सांगतो.

आपण जास्त पैसे कमवले नाहीत आणि फॅन्सी आयुष्य जगलो नाही, या गोष्टीचा उज्ज्वलला पश्चात्ताप होतो का? 'नक्कीच नाही', तो म्हणतो. 'माझ्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी माझ्याकडे पुरेशाहून अधिक आहे आणि ज्या गोष्टी मला परवडू शकत नाहीत त्या मला तो आनंद देऊ शकत नाही जो मला तरुण उद्योजकांना मदत केल्यामुळे मिळाला. कधी असुरक्षित काळ वाटला का? खरंतर नाही. कुटुंबाला नक्कीच काही कठीण काळातून जावं लागलं. जसं की त्याच्या पत्नीला जेव्हा कर्करोग झाल्याचे समजले, ज्याचे अंदाजपत्र ठरवलेच नव्हते. तथापि उज्ज्वलने 'प्रथम' या मंडळाबरोबर केलेल्या करारातून खात्री मिळाली की त्याचे नाममात्र वेतन व सोयीसुविधा या व्यतिरिक्त त्याचे सर्व वैद्यकीय खर्च त्यातून सांभाळले जातील. त्यामुळे ही कधीच गंभीर आर्थिक समस्या झाली नाही. आजारातून संपूर्णपणे बरी झालेली उषा त्याच्या आयुष्यात प्रचंड आनंद आणि स्थिरता आणत राहिली. प्रश्न विचारण्यासाठी थांबतो, ''मला खरंच किती गरज भासणार आहे?'' – जसं उज्ज्वलने केले नक्कीच तुमच्या आयुष्याला महत्त्वपूर्ण वळण देऊ शकते.

२००९ मध्ये आशीष श्रीवास्तव याने असेच केले. एक मध्यमवर्गीय मुलगा ज्याने इंजिनियरिंगचे शिक्षण पूर्ण केल्यावर इन्फोसिस या कंपनीसोबत काम करायला सुरुवात केली. पण त्याला खरंतर जे पाहिजे होतं ते हे नव्हतं. त्याने हे सोडायचं ठरवलं आणि 'Teach for India' सोबत काम करायचं ठरवलं. 'पुरेसं कमवण्याच्या' गरजेतून दिल्ली येथील NIIT या उत्तम पगाराच्या नोकरीकडे तो वळला. पण काही वर्ष तिथे काम केल्यानंतर त्याला जाणवू लागले की आपण अजूनही चुकीच्या ठिकाणी आहोत. त्याला असं काहीतरी करायचं होतं ज्याने सामाजिक परिवर्तन घडेल. त्याने त्याची नोकरी सोडायचा निर्णय घेतला आणि पुन्हा छत्तीसगढ मधील दंतेवाडा येथे त्याच्या नव-विवाहीत पत्नी शालिनी सोबत राहायचे असे ठरवले. शालिनीने त्याला 'बचपन बनाओ फेलोशिप' मध्ये व देशातील दुर्गम, नक्षलप्रभावीत भागातील आदिवासी मुलांना शिक्षित करण्यात मदत केली. आशिष आणि शालिनी आता छत्तीसगढ मधील सुकमा येथे राहतात आणि 'शिक्षर्थ' ही संस्था आदिवासी मुलांच्या शिक्षणाकरिता विनामोबदला चालवतात.

अझीम प्रेमाजी यांनी काही वर्षांपूर्वी ६३.००० कोटी रुपये दान करण्यापूर्वी स्वतःला जवळ जवळ सारखाच प्रश्न विचारला.

---

आयुष्यात खूप सारे जण येतात, जातात. पण जे आपल्या सुखदुःखात सामील होतात त्यांना मात्र शेवटच्या श्वासापर्यंत विसरायचे नसते.

२०१३ च्या सुरुवातीला मला त्यांच्या सोबत त्यांच्या गाडीतून ताजमहाल ते मुंबई विमानतळांपर्यंत प्रवास करण्याचा आनंद मिळाला. रस्त्यावरून विकत घेऊन प्रवासात खाल्लेली रुमाली रोटी व कबाब यातून त्यांचं साधेपण मला लक्षात आलं.

आपल्या भावतालचं जग कितीही बदललं तरी आपण लोभी न होता पूर्णतः विचार करून आपल्याला हवी तशी जीवन पद्धती जगली. अशा काही व्यक्तींबद्दल मी तुम्हाला सांगितलं कमी भाग्यवान लोकांना. लोकांना गरीबीतून बाहेर काढताना आणि आपल्या अद्वितीय पद्धतींनी समाजाचे ऋण फेडताना या सगळ्यांना एक विलक्षण आनंद मिळाला. यातले कोणीच त्यांना यातून मिळालेल्या आनंदाचा दुसऱ्या घरासाठी किंवा गाडीसाठी व्यापार करू शकत नाहीत. या सगळ्यासाठी काय लागतं, तर फक्त थोडं थांबा आणि विचार करा की, आपल्याला आपल्या जीवनात काय साध्य करायचं आहे. गांधींच्या शब्दात सांगायचे झाले तर खात्री बाळगा की, ''तुमच्या गरजांपुरती तुमच्याकडे असू दे'' कारण तुमच्या लोभासाठी कधीच काही पुरेसं नसेल.

–अनुवाद
**– गौरी अंबाजी परब**
(प्रथम वर्ष – पत्रकारिता)
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

## मुद्रण कला

मुद्रणकलेचा शोध लागला चीनमध्ये. तसाच सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी लाकडावर चित्रं कोरून, त्यांना शाई लावून, त्यांचे ठसे कागदावर घेतले जात. कालांतराने अक्षरे लाकडावर उलटी कोरून, त्यांचे ठसे कागदाच्या लांब सुरळ्यांवर घेतले जाऊ लागले आणि पुस्तकं तयार होऊ लागली. ११ मे १८६८ रोजी लिहिलेली सुरळी आणि इतर ३ हजार सुरळ्या एका बौद्धगुंफेत १९०७ मध्ये सापडल्या. हे सर्व ग्रंथ लंडनच्या ब्रिटिश म्युझियममध्ये सुरक्षित ठेवले आहेत.

आधुनिक मुद्रणकला १३ व्या शतकात उगम पावली ती युरोपमध्ये. बावन्न पत्ते सर्वप्रथम छापण्यात आले, नंतर संतचित्रं छापली गेली. १४२३ मधील संतचित्र नावासह छापण्यात आले ते संत ख्रिस्तोफर याचे. हेही ब्रिटनमध्ये आहे. या छपाईला 'शिलोग्राफी' असे म्हटलं जाऊ लागले. पुढे 'बायबल' छापलं. जाऊ लागलं. या कलेत जॉन गटेनबर्ग आणि लॉरेन्स कॉस्टर यांनी हॉलंडमध्ये १४४० मध्ये खिळे तयार करून १४४१ मध्ये 'आपल्या मुक्तीचा आदर्श' हे पुस्तक छापलं. जगातलं हे पहिलं मुद्रित पुस्तकं. गटेनबर्ग हा जर्मनीतील मेंज या गावचा. १४५० मध्ये त्यानं छापखाना काढला. १४५६ मध्ये 'बायबल' छापलं. याची १३०० पानं असून ते दोन भागात आहे. भारतात ही कला आली १५५६ मध्ये. गोव्यात पहिला छापखाना उभारण्यात आला. १९ ऑक्टोबर १५५६ रोजी कागदावर व्याख्यानाचे मुद्दे छापण्यात आले, हे पहिलं मुद्रण.

पुढे फादर स्टीफन्सचा 'ख्रिस्तपुराण' छापलं गेलं. मराठी भाषेचं व्याकरण १७९८ मध्ये आलं. मुंबईत १७९० मध्ये दोन छापखाने सुरू झाले. १८२२ मध्ये मराठी पुस्तक 'पंचोपाख्यान' आलं. १८२३ मध्ये 'विदुरनीती' हा सिलसिला सुरू झाला.

**– अरविन्द दोडे**
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२

# मराठी भाषेचे वैभव

*मराठी भाषेचं वैभव फार मोठं आहे. त्या वैभवाचा आढावा या लेखात देण्यात आला आहे- संपादक*

''भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषेचं स्वरूप हे समाजरचनेशी बांधलेले असल्याने, तिचं स्वरूप निश्चित झालंय. प्रगती, परिवर्तन, संघर्ष, आकांक्षा या सर्वांची ती स्वाभाविक बनली आहे. एक वाहन म्हणून, समाजाचं यथार्थ प्रतिबिंब भाषेच्या रचनेत, उपयोगात आणि अर्थसंपत्तीत दिसून येतं. मराठीचा सांस्कृतिक इतिहास पाहून पिढ्यांमधलं अंतर भाषिक नसतं, तर आशयात्मक असतं. जीवनात बदल झाले की, भाषेलाही नव्या संकेतांचा आधार घ्यावा लागतो. त्या संकेतांचे साहित्यिक मूल्य निश्चितच अभिमानास्पद आहे...''

मराठी भाषेचं वैभव फार मोठं आहे. त्या वैभवाचा विचार केला तर अनेक वर्षे मागे जावं लागतं. भाषा ध्वनिरूप असेल तर तिच्या नादलहरी विरून जातात. लिपीमुळे तिला दीर्घ आयुष्य लाभतं. लेखनाला महत्त्व आलं ते व्यक्तीव्यक्तीतील संपर्क साधणाऱ्या भाषेला दृश्य आणि सहजसुलभ आविष्कारामुळे. ग्रंथनिर्मितीची अनेक शतकांची वाटचाल पाहिली, तर लक्षात येतं की, पंधराव्या शतकात मुद्रणयंत्राचा उपयोग सुरू झाला. अनेक प्रती तयार होऊ लागल्या. धार्मिक अन् राजकीय प्रचार करणं सोपं झालं. ज्ञानविज्ञानाची प्रगती वेगानं सुरू झाल्यावर शिक्षण सोयीचं झालं. एक साचेबंद्ध सर्वमान्य भाषा अस्तित्वात आली. भाषेनं नवं वळण घेतल्यावर तिला स्थिरता लाभली.

मात्र ही मुद्रित भाषा साक्षरांपुरतीच होती. बोलणं शिकावं - शिकवावं लागतं. लिहिण्यावाचण्यासाठी अधिक कष्ट घ्यावे लागतात. साक्षरतेचा अभाव अन् अज्ञान ही अवस्था भाषेनं ओलांडली आहे, पण ज्ञान मिळवल्यावर एखादी गोष्ट करता येऊ लागल्यावर भाषेची गरज उरत नाही. केवळ दुसऱ्याला देताना भाषेची गरज भासते. उदाहरण म्हणून रेडिओद्वारा देण्यात येणाऱ्या ज्ञानाला भाषेची गरज असतेच. शिवाय ध्वनीच्या जोडीला चित्रकला साहाय्यक ठरल्यानं भाषेला अधिक लज्जत आली.

मराठीचा विचार करताना आपल्या लक्षात येतं की 'अनेक भाषिकत्व' हे एक फार मोठं दुखणं आहे. जन्म, धर्म आणि जातीप्रमाणेच आपल्याला भाषाही चिकटते. 'मातृभाषा' हा शब्द हे तिचंच एक गोंडस प्रतीक आहे. आपल्या मराठी मुलखात स्थानिक, प्रांतिक, सामाजिक आणि व्यावसायिक भेद असल्यानं हे अडथळे सहज आणि सहजीवनात ठायीठायी अनुभवायला मिळतात. म्हणूनच प्रमाणभाषा, राष्ट्रभाषा, संपर्कभाषा, आंतरराष्ट्रीय भाषा किंवा विश्वभाषा असे उपाय सुचवले जातात. केवळ प्रमाणभाषाच शैक्षणिक भाषा म्हणून, माध्यम म्हणून मान्यता मिळवू शकते, एवढंच!

महाराष्ट्रात मराठी विविध रूपात जिवंत आहे. नागपुरी, कोल्हापुरी, पुणेरी, मालवणी, कोकणी, खानदेशी अशा अनेक भाषा असून आपल्यातील भाषिक संघर्ष कधी संपेल का हा प्रश्न कायमच निरूत्तरित राहिलाय. दुसरं असं की, मराठीत नामाला तीन लिंगे आहेत. हिन्दी किंवा फ्रेंचमध्ये दोन आहेत. इंग्रजीत लिंगभेद नाही, तरीही सर्व ठिकाणी भाषाव्यवहार छान सुरू आहे. मराठी भाषेचे काही टप्पे मानले जातात, त्यात

प्रारंभीचा काळ दोन हजार वर्षांपूर्वीचा असून, त्यानंतरचे उपलब्ध पुरावे पाहिल्यास लोकगीतं, लोककथा या अलिखित साहित्याचा संदर्भ देता येतो. अकराव्या शतकात लिहिला गेलेला 'ज्योतिषरत्नमाला' हा मराठीतला पहिला ग्रंथ होय. ११८८ मधील संतकवी मुकुंदराज याचा 'विवेकसिंधू' हा ग्रंथ पहिला असं काही संशोधक म्हणतात. परंतु निर्विवादपणे सांगायचं तर महानुभवापंथातील संत म्हाईंभट्ट यांनी लिहिलेला 'लीळाचरित्र' हा प्रथम ग्रंथ म्हणता येतो. हा ग्रंथ गद्याचा पहिला पुरावा. त्यांनीच पुढे सुमारे १२८८ मध्ये 'गोविन्दप्रभुचरित्र' लिहिलं. १३१२ मध्ये 'स्मृतिस्थळ' हा ग्रंथ नरेन्द्र अन् परशुराम यांनी लिहून त्यात भर घातली. 'सिद्धान्तसूत्रपाठ' हा ग्रंथ १२८० मध्ये झाला. 'दृष्टन्तपाठ' हा त्याच काळातला. १३०९ मध्ये 'पूजावसर' हा पूर्ण झाला. १२१६ मध्ये दामोदर पंडितांचं 'वच्छाहरण', १२९२ मध्ये नरेंद्राच 'रुक्मिणी स्वयंवर', हे आणि असे अनेक ग्रंथ तयार झाले.

- भास्करभट्ट बोरीकरांचा 'शिशुपालवध' (१३१२),
- भास्करभट्ट बोरीकरांचा 'उद्धवगीता' (१३१३),
- विश्वनाथ बाळापूरकरांचा 'ज्ञानप्रबोध' (१४१८),
- खळो व्यासांची 'सह्याद्रिवर्णन' (१३५३),
- नारो बहाळिये यांचा 'ऋद्धिपूरवर्णन' (१४१८), याशिवाय
- महदंबा या पहिल्या मराठी कवयित्रीचे 'धवळे' (१२८६) (नवरदेवाला उद्देशून गायची गाणी).

**ज्ञानेश्वर काळ**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचा, वारकरी संप्रदायाचा काळ हा सुवर्णकाळ होता. सुमारे १२७५ ते १२९६ या काळात, अल्पकाळात ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचं वैभव वाढवलं. त्यांच्या असामान्य ओव्या आणि अभंगांनी भाषेची समृद्धी वाढवली. संस्कृताप्रमाणे प्रतिष्ठा मिळवून दिली. पुढे त्यांच्या समकालीन संतांनी त्यात मोलाची भर घातली. गोरा कुंभार, नामदेव, जनाबाई, चांगदेव, विसोबा खेचर, नरहरी सोनार, सावता माळी, परिसा भागवत, जोगा परमानंद, चोखामेळा, सोयराबाई अशा अनेक संतकवींनी मराठी भाषेचं ऐश्वर्य असे काही वाढवले आहे की, त्यांच्याच भक्तिकाव्यावर पुढच्या अनेक पिढ्या मराठीच्या प्रेमात पडल्या. अजूनही त्यांच्याबद्दलचा आदर कायम आहे.

भाषेचा अभ्यास करणं म्हणजे वाङ्मयाचा अभ्यास. १२७८ पासून १३५० पर्यंतचा काळ मराठी वाङ्मयाचा आदिकाळ आहे, तर पुढील २०० वर्षे अगदी सुनीसुनी गेली. १३१८ मध्ये देवगिरीच्या यादवांचे २५० वर्षांचं साम्राज्य संपलं. महाराष्ट्रात पारतंत्र्याचा काळोख पसरला. नंतर पंधराव्या शतकात श्रीपादश्रीवल्लभ आणि नरसिंह सरस्वती या दोन संन्याशांनी दत्त संप्रदाय स्थापन केला, त्यांचा काळ होता – १३७८ ते १४५८. 'गुरुचरित्र' हे त्यांचे ५२ अध्यायांचं असून त्यात ७ हजार ओव्या आहेत. जनार्दन स्वामी हे दत्तपंथी. त्यांचे शिष्य एकनाथ.

**एकनाथ काळ**

१३५० ते १६५० हा मराठी वाङ्मयाचा दुसरा कालखंड. या काळात झाले संतकवी एकनाथ आणि नाथांच्या नंतर तुकाराम. नाथांचे 'भागवत' आणि ज्ञानेश्वरांची 'भावार्थ-दीपिका' म्हणजेच 'ज्ञानेश्वरी', शिवाय तुकारामांची 'अभंगगाथा' हे तीन ग्रंथ म्हणजे वारकरी पंथाचे आराध्य ग्रंथ. यांना म्हणतात – 'प्रस्थान त्रयी'. नाथांनी 'ज्ञानेश्वरी'ची १५८४ मध्ये शुद्ध प्रत तयार केली. मराठी भाषेतील 'संहिता संशोधना'चा हा पहिलाच प्रयत्न. १५७१ मध्ये बनारसला राहून त्यांनी 'रुक्मिणी स्वयंवर' हे प्रसन्न प्रेमकाव्य लिहिलं. १७१२

ओव्या आणि १८ अध्यायात प्रेमाला भक्तीचं रूप दिलं आणि 'भावार्थ रामायण' हा ग्रंथ सुमारे ४० हजार ओव्यांचा लिहून झाला. पदं, अभंग, ओव्या, भारूड, गौळणी, विराण्या सर्वत्र गातात. एक संसारी संत आणि महान लोकशिक्षक म्हणून नाथांची ओळख आहे. त्यांची 'पैठण' नगरी प्रसिद्ध आहे.

दासोपंत (१५५१ ते १६१५) हे आंबेजोगाईचे. त्यांचे ५० ग्रंथ असून 'गीतार्णव' ही सव्वा लाख ओव्यांची 'गीते' वरील टीका सर्वश्रेष्ठ मानली जाते, तर 'गीतार्थ बोध चंद्रिका' ही ९ हजार ओव्यांची दुसरी गीताटीका त्यांचीच आहे. मराठीतलं पहिलं प्रेमकाव्य म्हणून सोळाव्या शतकातील लोलिंब नामक राजानं लिहिलेलं 'रत्नकलाचरित्र' मानलं जातं. यात यवन सुभेदाराच्या कन्येवरील कवीचं प्रेम वर्णन केलंय. (८७ श्लोकांचं)

फादर स्टीफन्स हे गोव्यातील इंग्रज मिशनरी. त्यांनी मराठीच्या गोमंतकीय बोलीचं व्याकरण लिहून 'ख्रिस्तपुराण' ओवीबद्ध केलं ते सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात.

मुक्तेश्वर हे एकनाथांचे नातू. मुक्तेश्वरांच्या काव्याला म्हणतात मराठी साहित्यातील, कोहिनूर. त्यांच्या 'भारतीपर्वा' मध्ये महाभारत ओवीबद्ध आहे. फक्त पाचच पर्वे उपलब्ध असून ती मराठीतील सर्वश्रेष्ठ रचना मानली जाते. कथानिवेदन, प्रसंगवर्णन, व्यक्तिदर्शन, अशा अनेक गुणांनी अव्वल दर्जा गाठलेला आहे. नवरसांनी परिपूर्ण हे काव्य युद्धवर्णनांच्या बाबतीतही अप्रतिम आहे. दर्जेदार आहे.

**तुकाराम काळ**

१६०८ ते १६५० हा तुकारामांचा काळ मानतात. साडेचार अभंगांची गाथा म्हणजे मराठी भाषेची वैभवसंपन्न प्रतिष्ठा आहे. भागवतधर्माचा पाया रचला माउली ज्ञानेश्वरांनी आणि भक्तिमंदिराचा कळस चढविला संत तुकारामांनी. बहिणाबाई झाली त्या मंदिराची भगवी पताका. तुकारामांचे अभंग आपल्या दैनंदिन जीवनातील भाषेत असून त्यांची वचने ही सुभाषितांसारखी वापरली जातात. 'जनसामान्यांचा असामान्य संतकवी' म्हणून आपण त्यांना ओळखतो. तुकाराम हे वारकरी पंथाला आलेलं एक अमृतमधुर फळ आहे.

नामदेवांचं भावकोमल काव्य, ज्ञानदेवांची अभिजात वाणी, आणि तुकोबारायांची परखड बोली म्हणजे वास्तवाची प्रखर जाणीव. त्यांचे दृष्टान्त आपल्या रोजच्या जगण्यातले आहेत.

त्यांचेच समकालीन दुसरे संतकवी होते समर्थ रामदास स्वामी. शिवरायांचा उदयकाल सुरू झाला होता, पण तुकारामांनी वैकुंठगमन केलं होतं. १३५० ते १६५० हा मराठीचा आणखी एक महत्त्वाचा कालखंड. १६५० ते १८१८ या कालखंडाचे पहिले कवी म्हणून समर्थांचा उल्लेख केला जातो. १६०८ ते १६८१ हा त्यांचा काळ. समर्थांनी देव, देश आणि धर्मासाठी इतर संतांपेक्षा वेगळं कार्य केलं. त्यांच्या काव्यात तत्कालीन राजकीय परिस्थितीचे पडसाद उमटलेले दिसतात. वीस दशक आणि दोनशे समास असलेला 'दासबोध' हा ग्रंथ म्हणजे जीवनगीताच आहे. त्यांची 'करुणाष्टकं' म्हणजे त्यांच्या मनाचा सुंदर सहज आविष्कार आहे. प्रपंच आणि परमार्थाचा समतोल कसा साधावा, विवेक आणि वैराग्य यांच्या संगतीनं कसं सार्थकतेनं जगावं हे त्यांचं तत्त्वज्ञान आजही उपयुक्त ठरतं आहे. आदर्श रामराज्याचं स्वप्न त्यांनी 'आनंदवनभुवना'त रंगवलं आहे. ते अवतरलेलं पाहून समाधान व्यक्त केलं आहे. 'मनाचे श्लोक' म्हणजे दासबोधाचं सार आहे. त्यातील प्रांजळपणा निकोप अन् निर्मळ असून विश्वसुखाची तळमळ आत्मकल्याणकारी आहे.

---

कधी कधी कोणावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःचे निर्णय स्वतःच घ्यावेत; बरोबर ठरला तर जिंकल्याचा आनंद मिळतो आणि चुकला तर अनुभव मिळतो.

रामदासांचे समकालीन वामनपंडित. त्यांचा 'यथार्थ दीपिका' हा ग्रंथ म्हणजे २२ हजार ओव्यांचं गीताभाष्य. 'सुश्लोक वामनाचा' ही कीर्ती त्यांच्या आख्यानकवितेमुळे मिळाली आहे. वामनपंडिताबरोबर सतरावं शतक संपलं आणि मराठीचा एक उज्ज्वल अध्यायही पूर्ण झाला. पंडित कवींमध्ये नागेश, विठ्ठल, सामराज आणि रघुनाथ यांचा समावेश होतो.

बहिणाबाई, निळोबाराया पिंपळनेरकर हे तुकोबारायांच्या परंपरेतील अखेरचे अन् महत्त्वाचे संत. लोकप्रिय कवी श्रीधरस्वामींचे 'वेदान्तसूर्य', 'हरिविजय', 'रामविजय', 'पांडव प्रताप', 'जैमिनी अश्वमेध' हे प्रसिद्ध आहेत. पंडित कवी मोरोपंत यांचा 'आर्याभारत'. रामकथा त्यांनी १०८ वेळा वेगवेगळ्या प्रकारे लिहिली आणि जागतिक विक्रम केला आहे. इतरही अनेक पुस्तके आहेत. ज्ञानेश्वरांची ओवी श्रेष्ठ, तुकारामांचा अभंग श्रेष्ठ, वामनपंडितांचा श्लोक श्रेष्ठ, तसाच मोरोपंतांचा आर्याछंद श्रेष्ठ. त्यांची 'केकावली' मधील कविता वाचनीय आहे.

## शाहिरी काळ

मराठी कवितेत एक नवा प्रवाह निर्माण झाला तो अठराव्या शतकात. त्याचं नाव – शाहिरी वाङ्मय. हे दोन प्रकारचं असून पोवाडा आणि लावणी असं आहे. शाहीर अज्ञानदास याच्या 'अफजलखानाचा वध' या पोवाड्यानं सुरू झालेला हा दमदार, प्रेरणादायी प्रकार प्रचंड लोकप्रिय झाला, तर रंगढंग आणि विलासी वृत्ती वाढत गेली, तेव्हा इश्काची गाणी गाणारी नर्तकी 'लावणी'च्या तालावर नाचू लागली. पोवाडा अन् लावणी हे प्रकार वाचण्यापेक्षा ऐकण्यात मजा आहे. पोवाडा वीर रसाचा, तर लावणी शृंगाराची.

सुमारे तीनशे पोवाडे उपलब्ध असून त्यातसुद्धा शिवकालीन चार आणि पेशवेकालीन दीडशे आहेत. उरलेले १८१८ नंतरचे म्हणजे पेशवाईनंतरचे आहेत. रामजोशी, अनंतफंदी, सगनभाऊ, परशुराम, प्रभाकर, होनाजी बाळा असे मुख्य लावणीकार झालेत.

चित्रपटांसाठी लावण्या अधिक लिहिल्या गेल्या. त्या गदिमा, पी. सावळाराम, जगदीश खेबूडकर यांची नावं घेतली जातात. 'नटरंग' मधील गुरु ठाकूरच्या लावण्या विशेष गाजल्या. उदा. 'मला जाऊ द्या ना घरी.' बैठकीच्या लावण्या गायिल्या त्या शोभा गुर्टू यांनी – 'पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा...'

## बखर वाङ्मय

आता आपण विचार करू या बखर वाङ्मयाचा. शिवरायांनी निर्माण केलेल्या स्वराज्यात गद्याच्या प्रांतात बखर वाङ्मय शाहिरीप्रमाणेच निर्माण झालं. 'शालिवाहनाची बखर' ही अत्यंत जुनी मानली जाते. 'राक्षसतागडीची बखर' आणि 'महिकावतीची बखर' ऊर्फ 'माहीमची बखर' या दोन्ही बखरी शिवरायांच्या आधीच्या आहेत. मुसलमानांच्या ऐतिहासिक वृत्तान्तलेखनाच्या प्रकारापासून प्रेरणा घेऊन मराठीत बखरलेखन सुरू झाले. १६८० नंतरच्या काळात सुमारे २०० बखरी लिहिल्या गेल्या. टिपणं, निवाडे, दैनंदिन्या आदी प्रकार त्यांत असून दंतकथा आणि आठवणी यांच्या साहाय्यानं त्या तयार झाल्याचं लक्षात येतं. शिवाय कागदपत्रांद्वारे व्यक्तिचरित्रं, घराण्यांचा इतिहास नोंदवला गेला. सवाई माधवरावाला शिक्षण देण्यासाठी नाना फडणीसांनी 'पेशव्यांची बखर' लिहून घेतली ती १७८२ मध्ये. 'नारायण व्यवहार शिक्षा' हे प्रकरणही 'बखरवजा' मानले जाते.

सभासदाची बखर (१६९७), वाकनीसांची ९१ कलमी बखर (१७६० ते ७०), र. या. चित्रेकृत 'चित्रगुप्ताची बखर' (१७६१), म. रा. चिटणीसकृत 'शिवचरित्र' (१८१०), खं. ब. चिटणीसकृत 'शिवदिग्विजय' (१८१८). वगैरे. शिवाय र. या. चित्रेकृत

मन शांत ठेवायला आणि उत्तराची प्रतीक्षा करायला शिकलात तर बहुतेक
सर्व प्रश्नांची उत्तरं तुमचं मन तुम्हाला देतं.

'पानिपतची बखर', 'भाऊसाहेबांची कैफियत', 'काशिराजाची बखर', 'भाऊसाहेबांची बखर' आणि 'होळकरांची थैली' ही पानिपत युद्धाची बखर अशा काही महत्त्वाच्या बखरी आहेत. 'हरिवंशाची बखर' ही बा. ह. पटवर्धनांची बखर अखेरची १८४२ मधली आहे.

'आज्ञापत्रे' ही रामचंद्र अमात्यांची पुस्तिका शिवरायांच्या राजकारणावर आणि राज्यव्यवस्थेवर प्रकाश टाकते. मराठ्यांनी लिहिलेली हजारो पत्रे उपलब्ध असून काही तंजावरच्या संग्रहालयात बघायला मिळतात. मोडीमधील अशीच काही पत्रे जयपूरलाही आहेत. त्यांचा अनुवाद करण्यासाठी अनुवादक हवे आहेत.

हा प्राचीन मराठी वाङ्मयाचा धावता आढावा झाला.

१. १८१८ पासून अर्वाचीन मराठी साहित्याचा कालखंड सुरू होतो. १८८५ पर्यंतच्या काळात कवितेला नवं रूपडं लाभलं. त्यांत कृष्णशास्त्री चिपळूणकरांचं कार्य मोठं आहे. संस्कृतकाव्याचे मराठी अनुवाद पुष्कळ झाले. शिवाय इंग्रजकाळात इंग्लिश काव्याची भाषांतरं प्रकाशित झाली.

मराठीत भावकविता प्रथम लिहिली ती विष्णू मोरेश्वर महाजनी यांनी. 'कुसुमांजली' हा त्यांचा काव्यसंग्रह. यात इंग्लिश कवितांना मराठी रूप दिलं आहे.

१८८५ ते १९२० या काळात केशवसुतांनी 'तुतारी' फुंकली आणि मराठीचं वैभव अधिक वाढलं. त्यांचा प्रभाव ना. वा. टिळक, रा. ग. गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज, बालकवी, बी. माधवानुज, एकनाथ रेंदाळकर, नरहर रहाळकर इ. कवींवर पडल्याचं दिसतं. लक्ष्मीबाई टिळकांनी दीर्घ आख्यानक कविता करून त्यांनी मानाचं स्थान मिळवलं. बहिणाबाई चौधरींच्या गीतांचा परिचय सर्वांना आहेत.

२. अर्वाचीन मराठी राष्ट्रीय कविता लिहिली ती कवी 'विनायक' यांनी आणि १८८३ मध्ये जन्मलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. गोविंद यांच्या देशभक्तीच्या कवितासुद्धा आपल्याला ठाऊक आहेत.

१८७३ ते १९४१ हा काळ आहे, महाराष्ट्राबाहेर राहून मराठी कविता करणाऱ्या भा. रा. तांबे या राजकवीचा.

३. १९२० ते १९४५ या काळात पुण्यात रविकिरण मंडळ स्थापन झालं. त्यात माधव ज्युलियन, गिरिश, यशवंत, श्री. बा. रानडे, मनोरमा रानडे, ग. त्र्यं. माडखोलकर, दिवाकर, द. ल. गोखले, वि. द. घाटे या थोर कवींनी मराठीला नवी काव्यमय दिशा दिली. जाहीर काव्यवाचन करून कविता लोकप्रिय केली. प्रातिनिधिक काव्यसंग्रह पुढील काळात प्रसिद्ध झाले.

या काळात विडंबन काव्याची एक वेगळी धारा केशवकुमारांनी अर्थात आचार्य अत्र्यांनी प्रवाहित केली. त्यांच्या 'झेडूंच्या फुलां'नी धमाल उडवली. १९२५ मध्ये हा संग्रह आला अन् विडंबनाची लाट आली. ना. गं. लिमये यांनी मेघदूताच्या धर्तीवर 'बल्लवदूत', ज. के. उपाध्ये यांनी 'चाल चलाऊ गीता', दि. वि. देवांनी 'उपहासिनी' विडंबनकाव्य लिहून त्यात भर घातली. परंतु हा प्रकार पुढे दमदारपणे टिकू शकला नाही.

अनिल, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर यांच्या काव्यात मराठीला वेगळं वळण मिळालं. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या पायी वैचारिक वादळ उठलं. त्या वादळामुळे थंडावलेली मराठी या तिन्ही कवींनी नव्या रूपात समोर आणली आणि 'क्रांतीचा जयजयकार' सर्वत्र घुमत राहिला.

कवी अनिलांनी 'मुक्तछंद' प्रकार लोकप्रिय केला

आणि पुढील पिढ्यांनी 'मुक्तछंद' भलताच वाढवून बदनाम केला. पूर्वी गल्लोगल्ली 'यमकीन' कवी होते, त्यात मुक्तछंदी कवींची भर पडली आणि बदाबदा काव्यसंग्रह बाजारात येऊ लागले. एक-दोन संग्रहातच कवी संपून जाऊ लागले.

कुसुमाग्रजांचा 'विशाखा' १९४२ मध्ये आला. अजूनही तो वाचला जातो. अभ्यासला जातोय. बोरकरांच्या प्रेमकवितांनी वेगळं वलय निर्माण केलं, तर शांता शेळके, संजीवनी मराठे, पद्मा गोळे, इंदिरा संत यांच्या रचनाही याच काळात गाजत होत्या. साने गुरुजींच्या कविता 'पत्री' या संग्रहात असून त्यातील विविधता लक्षणीय आहे. अनंत काणेकरांचा 'चांदरात'ही विलोभनीय आहे. ग. ल. ठोकळांचा 'मीठभाकर' (१९३८) प्रसिद्ध असून, सोपानदेव चौधरी यांची गेयकविता सहज गुणगुणावीशी वाटते.

अर्वाचीन कवितेत शाहिरी कविताही सुंदर आहे. पठ्ठे बापूराव, अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख हे या प्रवाहाचे प्रतिनिधी. साठ्यांनी पोवाड्यांतून जनजागृती केली.

४. १९४५ ते १९६५ हा चौथा कालखंड. ४७ साल हे नवकाव्याचं युगवर्ष. बा. सी. मर्ढेकरांची कविता आली. त्यांना 'दुसरे केशवसुत' म्हणून मानलं गेलं. पुढे विंदा, बापट, पाडगावकरांनी कार्यक्रम करून नवकविता घराघरात नेली आणि प्रतिष्ठित केली.

**मराठी नाटक**

मराठी नाटकाचा आणि रंगभूमीचा आरंभ विष्णुदास भावे यांच्या नाट्यकार्याने झाला. लोककला त्याआधी होतीच. तंजावरचं मराठी नाटक भाव्यांच्या पूर्वी होतं. प्राचीन काळापासून चेल राजे कलाप्रेमी, रसिक होते. त्यांची परंपरा व्यंकोजीराजे भोसले (म्हणजे शिवरायांचे सावत्र बंधू) यांनी अन् त्यांच्या वंशजांनी ही नाट्यपरंपरा दीर्घकाळ चालवली. ते स्वतः नाट्यलेखक होते. व्यंकोजींचे ज्येष्ठ सुपुत्र हेही (शाहराज) नाटककार होते. त्यांनी मराठीत १९, तेलगूत २५, संस्कृतात ४, हिन्दीत २ आणि पाच भाषांनी युक्त असं एक, अशी नाटके लिहिली.

तंजावरमध्ये भोसले घराण्याची सत्ता सुमारे १८० वर्षे होती. (१६७५ ते १८५५) परंतु त्यांचा मराठी रंगभूमीशी संबंध नव्हता. १८४३ मध्ये भाव्यांनी 'सीतास्वयंवर' या नाटकाचा प्रयोग केला आणि १८५१ मध्ये पहिलं भाषांतरीत नाटक 'प्रबोधचंद्रोदय' हे (मूळ संस्कृतावरून घेतलेलं) सादर करण्यात आलं. इंग्रजांच्या आमदानीत इंग्लिशवरून अनेक नाटकं अनुवादित झाली. १८६७ मध्ये महादेवशास्त्री कोल्हटकरांनी 'ऑथेल्लो' भाषांतरीत केले. याशिवाय शेक्सपीयरचं 'द मर्चंड अॅण्ड व्हेनिस' चं रूपांतर 'स्त्री-न्याय-चातुर्य' १८७१ मध्ये आ. वि. पाटकरांनी केलं.

विनायक जनार्दन कीर्तने यांनी १८६१ मध्ये 'थोरले माधवराव पेशवे' हे मराठीतलं पहिलं स्वतंत्र नाटक लिहिलं. बाळा कोटीभास्कर यांनी मराठीतला पहिला 'फार्स' लिहिला. पहिलं संगीतनाटक अण्णासाहेब किर्लोस्करांनी सादर केलं. त्याचं नाव 'संगीत शाकुंतल' १८८० मध्ये. नंतर 'संगीत सौभद्र'. पुढे 'रामराज्यवियोग' आलं... आणि मग गो. ब. देवलांनी ७ नाटकं लिहिली. त्यातली ६ अनुवादित आहेत. मृच्छकटिक, संशयकल्लोळ, शारदा आदी नाटकं गाजली. श्री. कृ. कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर, रा. ग. गडकरी आदींनी रंगभूमीचं वैभव अधिक वाढवलं.

**मराठी कादंबरी**

कविता आणि नाटकांच्या प्रदीर्घ परंपरेप्रमाणेच कादंबरी हा साहित्यप्रकार मोठा सशक्त आहे. १८८५

पूर्वी कादंबरीची जाणीव मराठीला झाली, ती १८१८ नंतर. आपलं मन ज्यांना बिघडवून घ्यायचं असेल, देव, देश आणि धर्मासाठी कार्य करायचं नसेल, आयुष्य वाया घालवायचं असेल त्यांनी कादंबरी वाचावी, असा आग्रह त्या काळातील विद्वानांनी धरल्यानं, कादंबरीचं लेखन करणं प्रतिष्ठित बाब न ठरल्याने मराठीत ती रुजायला वेळ लागला. १८५७ मध्ये बाबा पद्मनजी यांनी 'यमुना पर्यटन' लिहिली. १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांची 'मोचनगड' आली. १८८१ मध्ये वि. कों. ओक यांची 'शिरस्तेदार' आली.

लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला', १८६१ मध्ये आलेली काल्पनिक कथा म्हणून मराठीतली पहिली कादंबरी ठरते, तर काही समीक्षक हे 'मोचनगड' ला पहिला मान देतात. हरिभाऊंचा म्हणजे आपटे यांचा कालखंड सुरू होतो. १८८५ ते १९२० या काळात 'पण लक्षात कोण घेतो?' ही १८९३ मध्ये प्रकाशित झाली. 'वज्राघात' ही १९१५ मधली, म्हणजे मराठी कादंबरीचं वय वर्षे अवघं शंभर!

ना. सी. फडके युग सुरू झालं ते १९२० पासून. जादूगार (१९२८), दौलत (१९२९) आणि अटकेपार (१९३१) वगैरे कादंबऱ्या गाजल्या. श्रीधर व्यंकटेश केतकर, मालतीबाई बेडेकर यांनी कादंबरीलेखन केलं. वि. स. खांडेकरांनी याच काळात लेखन करून ध्येयवाद निर्माण केला, तर ग. त्र्यं. माडखोलकर आणि पु.य. देशपांडे यांनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या. १९४२ मध्ये मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस' या कादंबरीत संज्ञाप्रवाह प्रथमच साकारला. मैलाचा दगड ठरलेली विश्राम बेडेकरांची 'रणांगण' ही नेमाड्यांच्या 'कोसला' प्रमाणेच अजूनही श्रेष्ठ मानली जाते. श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, गो. नी. दांडेकर, उद्धव शेळखे यांचा उल्लेख हवाच.

**मराठी कथा**

या धावत्या अभ्यासनोंदी असल्याने आधुनिक युगातील साहित्याचा उल्लेख करणे कठीण आहे. जुन्या इतिहासाला उजाळा देणे एवढाच हेतू आहे. नवा इतिहास आपल्याला ठाऊक आहे.

कथा प्रकार प्राचीन आहे, परंतु १८९० मध्ये ह. ना. आपटे यांनी 'करमणूक' या नियतकालिकात कथा द्यायला सुरुवात केली आणि 'स्फुट गोष्टी' म्हणून त्या लोकप्रिय झाल्या. कहाण्या, लोककथा होत्याच. 'आटपाटनगरा'तील कहाण्या मोठ्या हृदयस्पर्शी आहेत. १८०६ मध्ये तंजावरच्या सरफरोजी राजांनी इसापनीतीचं भाषांतर सखन पंडिताकडून करवून घेतलं, 'बालबोध मुक्तावली' हे त्याचं नाव. नंतर 'हितोपदेश', 'पंचतंत्र', 'सिंहासन-बत्तिशी' इ. पुस्तके प्रकाशित झाली.

वि.सी. गुर्जर यांनी सुमारे ७०० कथा १९१० ते १९६२ या काळात लिहिल्या. बोधकथेला त्यांनी अधिक रंजक केली. श्री. कृ. कोल्हटकरांचे 'सुदाम्याचे पोहे' चवदार ठरले, विनोदाचे पर्व सुरू झाले. त्यात रा. ग. गडकरींच्या 'बाळकराम' याने अधिक हसवलं. फडके, खांडेकर, य. गो. जोशी, र. वा. दिघे, चिं. वि. जोशी ही काही श्रेष्ठ कथाकार मंडळी. स्त्रियांचे योगदानही उल्लेखनीय आहे.

१९४४ नंतर नवकथा अवतरली. रा. भि. जोशी, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे, यांनी मराठी कथेचा साज वाढवला. ती अधिक देखणी झाली. अरविन्द गोखले, पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ, शांताराम, दि. बा. मोकाशी, श्री. ज. जोशी, पु. शि. रेगे, सदानंद रेगे या नामवंतांनी मराठी कथा पुढे नेली. शंकर पाटील, द. मा. मिरासदार, शंकरराव खरात, मधु मंगेश कर्णिक, आनंद यादव, रा. रं. बोराडे, अशी नाव तरी किती सांगावीत? १९४५ नंतर विनोदी कथा मोठ्या

---

मन इतकं मोठं असूद्या की कोणीही तुमच्या शेजारी बसू शकेल आणि मान असा मिळवा की तुम्ही उभं राहिल्यावर कोणीही बसू शकणार नाही.

प्रमाणात लिहिली गेली. त्यात वि. आ. बुवा, अ. वा. वर्टी, जयवंत दळवी आदींची नावे घेतली जातात.

### मराठी लघुनिबंध

मराठी लघुनिबंध १९२७ च्या आसपास जन्मला. शि. म. परांजपे, न. चिं. केळकर आदी विचारवंत संपादकांनी 'गुजगोष्टी' लिहिल्या. इरावती कर्वे, दुर्गा भागवत, म. ना. अदवंत, श्रीपाद जोशी, सरोजिनी बाबर आणि विंदा करंदीकर यांचे लघुनिबंध गाजले. मंगेश पाडगावकरांचा १९५६ मध्ये आलेला 'निंबोणीच्या झाडामागे' हाही वाचनीय संग्रह आहे. १९६५ मध्ये श्रीनिवास कुलकर्णी यांचा निबंध 'डोह' आला, तर देवीदास बागूल, वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै यांचे निबंध काव्यमय, दिलखुलास आहेत.

सध्या ज्याला ललितगद्य म्हणतात तो निबंध वेगळा अवतार आहे. स्वतंत्रपणे चमकणारा हा लेखन प्रकार आता एका व्यापक प्रकारात गणला जातो. रविवारीय आवृत्यांमधील लेख हे असेच ललितबंध असतात.

विनोदी साहित्य आणि प्रवासवर्णनं, चरित्रं, आत्मचरित्र, बालसाहित्य, बालनाट्य, चित्रकथा, समीक्षा, इतिहास, विज्ञानग्रंथांचा उल्लेख करायचा झाल्यास एक स्वतंत्र ग्रंथ होईल. महाराष्ट्राबाहेरील मराठी साहित्य हा एक वेगळाच, स्वतंत्र विषय आहे.

चित्रकला, शिल्पकला, ग्रंथालयशास्त्र यांची दालनंसुद्धा समृद्ध आहेत, तसंच साहित्य संमेलनांच्या अभ्यासपूर्ण स्मरणिका, मान्यवरांचे गौरव ग्रंथ वगैरे वेळोवेळी प्रकाशित होत असतातच. अनुष्टुभ, सत्यकथा, अभिरुची, ललित, साहित्यसूची, युगवाणी, म. सा. पत्रिका, नवभारत अशा मोजक्या मासिकांनी मराठी भाषेचं संवर्धन केलंय. साहित्य संस्कृती मंडळाचे कोशवाङ्मय निर्मिती आणि मराठी भाषा विकास परिषद आणि मराठी संशोधन पत्रिका यांची ग्रंथनिर्मिती मराठीची शान वाढवत आहेत.

### वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज

२७ फेब्रुवारी १९१२ रोजी तात्यासाहेबांचा जन्म झाला. हाच दिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. पुण्यात जन्मलेले तात्या ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी ठरले. कथाकार, कादंबरीकार, कवी, नाटककार, आणि निबंधकार म्हणून त्यांची ओळख आहे.

१९७४ मध्ये नटसम्राट या नाटकास साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. वि. स. खांडेकर यांना 'ययाती' निमित्त ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला होता. शिरवाडकरांच्या नंतर भालचंद्र नेमाडे यांना हा मान मिळाला आहे. १० मार्च १९९९ रोजी तात्यासाहेब अनंतात विलीन झाले. नाशकात 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' स्थापन झाले. ते या साहित्यिकाचं एक सुंदर स्मारक आहे.

'मराठी राजभाषा दिन' हा साजरा करताना मराठीचा जागर करावा. कथाकथन, काव्यवाचन, ग्रंथवाचन, नाट्यसादरीकरण, गाणी आदी कार्यक्रम करावेत अशी अपेक्षा आहे, जागतिक पातळीवर हा दिवस एक उत्सव म्हणून संपन्न करताना मराठीची थोर परंपरा समजून घ्यावी ही अपेक्षा.

**– अरविन्द दोडे**
शालन भोईर वाडी, खोपट,
साहिल हॉस्पिटलजवळ,
ठाणे (प.).४०० ६०१
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२
E mail : arvinddode@gmail.com

•••

जगातील सर्वात स्वस्त वस्तू म्हणजे 'सल्ला'. एकाकडे मागा हजारजण देतील. जगातील सर्वात महाग वस्तू म्हणजे 'मदत'. हजार जणांकडे मागा; कदाचित एखादाच करेल.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### नर्सरी विभाग (२०१७-२०१८) वार्षिक अहवाल

शैक्षणिक विभाग २०१७-१८ सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूलच्या पूर्व-प्राथमिक विभागासाठी महत्त्वाचे वर्ष ठरले. २३ जून २०१७ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय वा. बेडेकर यांच्या हस्ते शाळेच्या एका नवीन पर्वाला नर्सरी विभागाला सुरुवात झाली. त्यांनी नर्सरीच्या लहानग्या मुलांबरोबर तुळस आणि कडुलिंबाची रोपे लावून ह्या विभागाचे उद्घाटन केले. ह्या ऐतिहासिक समारंभाला मंडळाचे सर्व कार्यकारी सदस्य, डीन सौ. कालिंदी कोल्हटकर, शाळेच्या सर्व विभागाचे प्रमुख आणि शिक्षकांची उपस्थिती लाभली.

नर्सरी विभागात टेडी आणि पपी असे दोन वर्ग आहेत. ह्या वर्गातील विद्यार्थ्यांची पटसंख्या अनुक्रमे ३२ आणि ३३ आहे. नर्सरी विभागातील भिंती माध्यमिक विभागातील विद्यार्थी आणि चित्रकला शिक्षकांच्या मदतीने जलचर आणि जंगलातील प्राणी यांच्या चित्रांनी आकर्षक करण्यात आल्या आहेत. मुलांच्या सूक्ष्म आणि स्थूल कारक विकासासाठी तसेच खेळता खेळता शिक्षण पद्धतीसाठी आवश्यक असणारे शिक्षण साहित्य नर्सरी विभागात आहे.

बालवयातील संस्कार मुलांना भविष्यात सुजाण नागरिक घडविण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचा हातभार लावत असतात हे शिक्षक जाणून असल्यामुळे विविध सण आणि उपक्रमांच्या माध्यमातून नर्सरीतील मुलांच्या बालमनावर चांगले संस्कार, आचार-विचार रुजविण्याचे कार्य शिक्षक करीत असतात. विद्यार्थ्यांना प्रत्येक सणाविषयी थोडक्यात माहिती दिली गेली आणि पर्यावरणाचा समतोल राखून सण कसे साजरे केले जाऊ शकतात ह्यांची प्रात्यक्षिकेही दाखविली गेली.

आषाढी एकादशीला मुले पारंपरिक वेशभूषेत आली होती आणि वर्गातच दिंडीही काढली गेली. त्यांनी विठूरायाची गाणी गाऊन त्यांचा आशीर्वाद घेतला.

नागपंचमीला शेताची प्रतिकृती करून सापाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच साप, नाग, दूध पित नाहीत त्यामुळे नागाच्या मूर्तीवर दुधाचा अभिषेक न करण्याविषयी सांगितले. छोट्यांनी चिकणमातीचे छोटे-छोटे नाग करून शेताच्या प्रतिकृतीत ठेवले.

४ ऑगस्टला रक्षाबंधन साजरा करण्यात आला. आपल्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान असणाऱ्या झाडं न तोडता, जास्तीत जास्त झाडे लावण्याचा आणि त्यांचे रक्षण करण्याचा संदेश मुलांना देऊन झाडाला राखी बांधली. चिमुरड्यांनी स्वतः तयार केलेली राखी एकमेकांना बांधली.

१५ ऑगस्टला सुट्टी असल्यामुळे ११ ऑगस्टला स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. नर्सरीच्या मुलांनी तिरंग्याचे रंग असणारे वेष परिधान केले होते. सामुहिक प्रार्थनेच्या वेळी सर्वांनी ध्वजवंदन करून राष्ट्रगीत गाईले. नंतर शिक्षकांनी स्वातंत्र्यदिनाविषयी थोडक्यात माहिती सांगितली. तसेच स्वातंत्र्यवीरांची चित्रे दाखवून त्यांनी केलेल्या कार्याची ओळख करून दिली. अखेरीस मुलांनी देशभक्तीपर गीते गाऊन स्वातंत्र्यदिनाची सांगता झाली.

भाद्रपद शुद्ध ४, महाराष्ट्रात सर्वत्र मोठ्या उत्साहात गणेश चतुर्थी म्हणून साजरा केला जाणारा सण नर्सरी

विभागाने २४ ऑगस्टला गणेशोत्सव उल्हासात साजरा केला. गणेशोत्सवापूर्वी मुलांना गणेश जन्म आणि विविध कथा असलेली चित्रफीत दाखविली. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सव कसा साजरा करू शकतो यांची थोडक्यात माहिती सांगितली. २४ ऑगस्टला पर्यावरणपूरक सजावट करून शाडूच्या मातीच्या गणपती बाप्पाची मुलांनी वाजत-गाजत स्थापना केली. नंतर त्यांची मनोभावे पूजा व आरती केली. दिवसाच्या शेवटी पारदर्शक बादलीत गणेशाचे विसर्जन केले. थोड्या वेळाने ती मूर्ती पाण्यात कशी एकजीव होते ते मुलांनी पाहिले आणि नंतर ते पाणी झाडांना घालण्यात आले.

नवरात्र देवीच्या नऊ रुपांची पूजा करण्याचा सण मुलांनी नऊ दिवस नऊ रंगाचे कपडे घालून हा सण साजरा केला. तसेच भोंडलाही खेळला गेला. दहावा दिवस, दसरा ह्याचे थोडक्यात महत्त्व सांगून सरस्वती पूजन केले.

पहिल्या सत्रातील शेवटचा आणि वर्षातील सर्वात मोठा सण, दिव्यांचा सण दिवाळी. दिवाळीची सुट्टी सरू होण्याअगोदर दिवाळीचा सण साजरा करण्यात आला. मुले नवीन कपडे घालून आले होते. ह्या दिवशी दिवाळीच्या चार दिवसांचे महत्त्व सांगितले. तसेच मोठे आवाज, धूर करणारे फटाके न वाजविता दिवे लावून दिवाळी साजरी करण्याविषयी सांगितले. नंतर मुलांनी शिक्षकांच्या मदतीने दिवे लावून, संगीतावर नाचून खूप मजा केली. शेवटी चकली आणि लाडूचा फराळ खाऊन मुलांनी एकमेकांना शुभेच्छा देऊन निरोप घेतला. अशाप्रकारे नर्सरी विभागाच्या पहिल्या सत्राची आनंदात सुखद आठवणी मनात ठेवून सांगता झाली.

२ नोव्हेंबर २०१७, नर्सरीच्या दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली. हे सत्र विविध उपक्रमांनी भरगच्च भरलेले असते. जेणे करून मुलांचा सर्वांगीण विकास साधला जातो. मुलांच्यातील सुप्त गुणांना विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो.

१४ नोव्हेंबर पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस देशभरात बालदिन म्हणून साजरा केला जातो. आमच्या नर्सरी विभागातही हा दिवस फॅन्सी ड्रेस डे चे आयोजन करून साजरा करण्यात आला. आपापल्या आवडीच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेशभूषेत आमची बच्चे कंपनी खूप गोड, आकर्षक दिसत होती. प्रत्येकाने स्वतःच्या वेशभूषेची ओळख करून देऊन नर्सरीचा बालदिन संस्मरणीय केला.

नर्सरी विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन १६ डिसेंबर रोजी विद्यालंकार सभामंडपात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नर्सरी विभागप्रमुख सौ. अपर्णा वरुडकर यांनी नर्सरी विभागाची व इतर उपक्रमांची माहिती दिली. नंतर छोट्या कलाकारांनी नृत्ये सादर केली ज्याची तयारी १ डिसेंबरपासूनच करत होते. कार्यक्रमाच्या संचालनाची व आभारप्रदर्शनाची जबाबदारी आमच्या चिमुकल्यांनी समर्थपणे पार पाडून सर्व प्रेक्षकांची तसेच मान्यवरांची वाहवा मिळवली.

१९ डिसेंबरला नर्सरीचा क्रीडादिन घेण्यात आला. मुलांचे वय, क्षमता लक्षात घेऊन विविध स्पर्धात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. धावणे, ठोकळे बादलीत ठेवून बादली घेऊन पळणे, दोन मुलांनी (एकत्र) रिंग घेऊन उड्या मारत धावणे. अशा खेळांमध्ये सर्वच मुलांनी मोठ्या उत्साहात भाग घेतला. सर्वांना प्रोत्साहन देण्यासाठी छोटे चेंडू बक्षीस म्हणून देण्यात आले.

२० डिसेंबरला मुलांना अल्पोपाहार देण्यात आला. ह्या दिवशी छोट्यांना छोले, पुरी आणि गाजर हलवा देण्यात आला. मुलांनी पुरी आणि हलवा मनसोक्त खाऊन अल्पोपाहार रुचकर असल्याची दाद दिली.

---

'वाणी' आणि 'पाणी' जपून वापरा. वाणीमुळे तुमचा 'वर्तमानकाळ' व पाण्यामुळे तुमचा 'भविष्यकाळ' सुरक्षित राहणार आहे!

२१ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या आनंद बाजारात नर्सरीच्या मुलांनी गिऱ्हाईक बनून पालकांसोबत खरेदीचा मनसोक्त आनंद लुटला.

२५ डिसेंबर येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस, ख्रिसमस मोठ्या उत्साहात २२ डिसेंबरला साजरा करण्यात आला. व्हरांड्यात चांदणी लावली होती. तसेच ख्रिसमस झाडही सजविले होते आणि बाजूला बर्फाचा मानव ठेवला होता. सफेद आणि लाल रंगाच्या आकर्षक वेशात आलेल्या मुलांबरोबर आमच्या चिमुकल्या सांताक्लाजने नाच केला; गाणी गायली आणि जाता जाता सर्वांना गोड गोड केक दिला.

१२ जानेवारी रोजी नर्सरी विभागाची सहल घोडबंदर रोडवरील 'मोनालिसा लॉन आणि गार्डनला' नेण्यात आली होती. नर्सरीच्या ५० मुलांनी सहलीचा आनंद लुटला. सकाळी ११ वाजता बसने निघून ११.३० ला मोनालिसा गार्डनमध्ये पोहोचलो. गेटजवळ छोट्यांचे स्वागत करायला मोटू-पतलू आले होते. सर्वांना ताजेतवाने होण्यासाठी कोकम सरबत देण्यात आले. मनसोक्त खेळून झाल्यावर दुपारी श्रीखंड, पुरी, बटाट्याच्या भाजीचा मनसोक्त आस्वाद घेतला. नंतर सर्वांनी जादूचा प्रयोग पाहिला आणि जाता जाता चॉकलेट केक आणि चॉकलेटचा खाऊ खाऊन सहलीच्या गोड आठवणी मनात साठवून शाळेत ४ वाजता परत आलो.

१५ जानेवारीला मकरसंक्रात हा सण साजरा केला गेला. ह्या सणाविषयी थोडक्यात माहिती सांगून आपण तिळ व गुळाचे पदार्थ का खातो? काळे कपडे घालण्यामागचे कारण सांगण्यात आले. तसेच ह्या सणादिवशी खेळण्यात येणाऱ्या पतंग महोत्सवाविषयी माहिती दिली. शेवटी सर्व मुलांना 'तिळगूळ घ्या गोड गोड बोला' असा संदेश देऊन तिळाच्या वडीचे वाटप करण्यात आले.

२५ जानेवारीला प्रजासत्तक दिन (२६ जानेवारी) साजरा करण्यात आला. मुलं झेंड्याचे रंग असलेले कपडे घालून आले होते. शिक्षकांनी प्रजासत्ताक दिनाची थोडक्यात माहिती देऊन आपल्या विविध राष्ट्रीय चिन्हांची चित्रं दाखविली. नंतर त्यांनी पतंगाच्या चित्रावर भेंडीच्या सहाय्याने भगवा आणि हिरव्या रंगाचे ठसे-काम केले.

फेब्रुवारी महिन्यात मुलांची परिसर सहल शाळेच्या जवळच असलेल्या गणपती मंदिरात नेण्यात आली. मंदिराबरोबरच बेडेकर शाळा, शाळेचा परिसर, बँक, आजूबाजूची दुकान दाखवून त्यांची थोडक्यात माहिती दिली. आजूबाजूचा परिसर शिक्षकांबरोबर पाहण्याचा अनुभव त्यांना मिळाला.

१९ फेब्रुवारीला नर्सरी विभागाचे पहिले वहिले कला आणि हस्तकला वस्तूंचे प्रदर्शन होते. मुख्य दरवाजा हा सुस्वागतमचे तोरण, सुविचार आणि फुलांनी सजविला होता. वर्गाच्या दरवाजाजवळ रंगीबेरंगी खडू, मणी, आरसा, चिकणमाती, बटण या वस्तूंचा वापर करून रांगोळी काढण्यात आली होती. नर्सरीचे प्रदर्शन सकाळी ९.३० वाजता सुरू झाले.

ट्रॅफीक सिग्नल आणि रोड मॉडेलच्या सहाय्याने त्यांनी वाहतूक नियमांविषयी माहिती सांगितली. तसेच वाहतूक नियमांचे पालन करण्याविषयी आवाहन केले. नियमित फळे आणि सुकामेवा खाण्याचे फायदे सांगितले. सूक्ष्मकारक आणि स्थूलकारक विकासासाठी शाळेत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची प्रात्यक्षिके या लहान मुलांनी प्रेक्षकांना करून दाखविली.

नर्सरी विभागात मुलांना शिक्षणाबरोबरच स्वावलंबनाचे धडेही दिले जातात. १९ जानेवारीला शिक्षकांच्या मदतीने मुलांनी स्वतःचा गणवेश स्वतः घालून स्वावलंबनाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले.

---

आनंदी राहण्याचा साधा एकच मंत्र आहे; अपेक्षा स्वतःकडूनच ठेवा, समोरच्याकडून नका ठेवू!

वेळोवेळी मुलांना समुपदेशन करण्यात येते. आठवड्यातून दोनदा त्यांना चांगल्या सवयी, चांगली वर्तणूक, स्वतःची काळजी, रक्षण करण्याविषयी, चांगला आणि वाईट स्पर्श अशा विविध विषयांची माहिती शिक्षकांकडून दिली जाते.

सूक्ष्मकारक आणि स्थूलकारक विकासासाठी विविध उपक्रम राबविले गेले. केळे, संत्र सोलून खाणे, चिकणमातीने खेळणे, मणी ओवणे, हिरव्या फळ्यावर खडूने लिहिणे, चित्र काढणे, कागद फाडणे, कचरा काढणे इत्यादी सर्व उपक्रमांना मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसादही मिळाला.

दुसऱ्या सत्राची सांगता छंदवर्गाने करण्यात येणार आहे. ह्या छंदवर्गात स्वतः केलेल्या हस्तकला वस्तू मुलं नर्सरीची आठवण म्हणून घरी घेऊन जाणार आहेत.

नर्सरीचे पहिले शैक्षणिक वर्ष २०१७-१८ शाळेच्या डीन मॅडम कोल्हटकर, पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०१७ -२०१८ चे निकाल :**

इ. ६ वी - कु. श्रेया दांडेकर - रौप्य पदक

**एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०१७ - २०१८ :**

एलिमेंटरी श्रेणी परीक्षा - ९०%

एकूण विद्यार्थी - ८९

उत्तीर्ण विद्यार्थी - ८०

'अ' श्रेणी - ०४ 'ब' श्रेणी - ०९ 'क' श्रेणी - ६७

इंटरमिजिएट श्रेणी परीक्षा - ९६%

एकूण विद्यार्थी - ६७

उत्तीर्ण विद्यार्थी - ६४

'अ' श्रेणी - ०२ 'ब' श्रेणी - १५ 'क' श्रेणी - ४७

***COE (Cyber Olympiad Exam- 2nd Level)* युनिफाईड कॉन्सिल परीक्षा-(राष्ट्रीय स्तरावर) निकाल :**

इ.६ वी - सार्थक कुलकर्णी - २६५ क्रमांक

इ.८ वी - सिद्धार्थ वर्णेकर - १४१ क्रमांक

**टिळक विद्यापीठ सायबर परीक्षेचा निकाल : १००%**

| इ. | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | प्राविण्य प्राप्त विद्यार्थी | प्रथम श्रेणीत उत्तीर्ण | द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण | तृतीय श्रेणीत उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ५वी | १३ | - | १२ | ०१ | - |
| ६वी | २२ | - | ११ | ०९ | ०२ |
| ७वी | २० | - | १० | ०७ | ०३ |
| ८वी | ०७ | - | ०५ | ०२ | - |
| ९वी | ०१ | - | ०१ | - | - |
| १०वी | ०१ | - | - | ०१ | - |

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी तुमची यश मिळवण्याची इच्छा ही अपयशाच्या भीतीपेक्षा मोठी असली पाहिजे.

सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५वी | महेश्वरी राणे | ७८ |
| | वरद सरवटे | ७८ |
| ६ वी | सार्थक कुलकर्णी | ७४ |
| ७ वी | इशान फणसे | ७२ |
| ८ वी | प्रथम तोलानी | ७४ |
| ९ वी | यश चाबूकस्वार | ७० |


**Geo Genius Aayaaoijata Geography Olympiad चा राष्ट्रीय स्तरावरील निकाल :**

१) कु. शुभम शेळके – अंतिम फेरीत चषक

२) कु. हर्षल पेडणेकर – सहभाग प्रमाणपत्र

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

### प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांना राष्ट्रपती भवन दिल्ली येथून पुस्तक विमोचन कार्यक्रमाचे निमंत्रण


2751804136

*Dr. PP Dharamadhikari*
*is cordially invited to the release*
*of the book*
*"Dr Babasaheb Ambedkar : Vyakti Nahin Sankalp"*
*by Shri M Venkaiah Naidu*
*Hon'ble Vice President of India*
*at Darbar Hall, Rashtrapati Bhavan on Saturday, April 14, 2018 at 1800 h*
*Shri Ram Nath Kovind*
*Hon'ble President of India*
*will receive the first copy of the book.*

R.S.V.P. Tel : 23012960, e-mail : invitation@rb.nic.in Dress : Formal

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयातील प्रा. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांना किशोर मकवणा संपादीत, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती नहीं संकल्प' या पुस्तकाच्या विमोचन कार्यक्रमाचे निमंत्रण राष्ट्रपती भवन दिल्ली येथून मिळाले. हा कार्यक्रम दि. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती भवनाच्या प्रसिद्ध दरबार हॉल येथे भारताचे महामहिम राष्ट्रपती माननीय श्री. रामनाथ कोविंद, माननीय उपराष्ट्रपती श्री. वेंकय्या नायडू तसेच लोकसभेच्या अध्यक्षा माननीय सुमित्राताई महाजन यांच्या उपस्थितीत पार पडला.




'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती नहीं संकल्प' या पुस्तकात देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी डॉ. आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी कोणत्या योजना राबविल्या याचा ऊहापोह केला आहे. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रा. धर्माधिकारी यांचे अभिनंदन केले आहे.


### वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान: पुष्प १४ वे

### विद्यार्थ्यांना पोटार्थी बनवण्यापेक्षा कलार्थी बनवा : विजयराज बोधनकर

दि. २८ एप्रिल २०१८ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे १४ वे पुष्प ज्येष्ठ चित्रकार व लेखक श्री. विजयराज बोधनकर यांनी ललित कला, कलावन्त आणि भारतीय समाज या विषयावर गुंफले. या कार्यक्रमात प्रारंभी महाविद्यालयाच्या वार्षिक युवाशिल्प या वार्षिक अंकाचे प्रकाशन झाले. यावेळी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, युवाशिल्पचे संपादक प्रा. संतोष राणे, बीएमएमचे समन्वयक

सकाळच्या वेळी तुम्ही झोपाल तर तुम्हाला बरे वाटेल, पण तुमचे यशदेखील कायमचेच झोपेल. – कर्मवीर भाऊराव पाटील

डॉ. महेश पाटील व परफेक्ट प्रिंटसचे श्री. विलास सांगुर्डेकर उपस्थित होते.




यावेळी युवशिल्पचे संपादक प्रा संतोष राणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. युवशिल्पच्या सृजनशील निर्मितीतील सहभागी सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांचे प्रा- राणे यांनी आभार मानले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ सुचित्रा नाईक यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला मानवी संवेदनशीलता हरवत जात असल्याची खन्त व्यक्त केली. युवज्ञशिल्पच्या अंकावर मुद्रित केलेल्या स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून लिहिलेल्या ओळी या प्रसंगी डॉ. सुचित्रा नाईक यांनी उद्धृत केल्या. युवाशिल्पच्या अंकात पुढच्या वेळी चित्रकलेच्या अनुषंगाने एखादा विशेष विभाग करावा असा मोलाचा सल्ला यावेळी डॉ. नाईक यांनी दिला.

श्री. विजयराज बोधनकर म्हणाले की, मनाची अस्वस्थता हे हल्लीच्या जगात एक व्यसन आहे. संवेदनशील मनाच्या उभारणीत कलेची अभिव्यक्ती मोलाची भर टाकते. स्वतःच्या आनंदासाठी चित्र वा कला जोपासणारा कलाकार हा मरणानंतर देखील अजरामर होते. ज्येष्ठ चित्रकार गायतोंडे , तयब मेहता यांच्या जीवनावर बोधनकरांनी प्रकाश टाकला. शिल्पकार वा कलाकार होऊन पोट भरत नाही म्हणून हल्ली सर्वांचा ओढा आयटी, अभियांत्रिकी कडे आहे. चित्र हा शब्द चित्त या संस्कृत शब्दापासून बनला असून कला हा शब्द कल या शब्दापासून बनला आहे, आपलं चित्त व कल पाहून कलेच्या प्रांतात आपला पाल्य किती मुशाफिरी करेल हे पालकांना समजलं पाहिजे असंही ते म्हणाले.

लव्हीनिया फॉन्टणीया या १२ व्या शतकातील एका इटालियन चित्रकार स्त्रीने १२०० चित्रं काढली हे किती कौतुकास्पद आहे. कारण कला ही स्त्री पुरुष भेदाच्या पुढे जाते. ज्ञानेश्वरी मध्ये ज्ञानेश्वरांच्या कलात्मक प्रतिभेला बहर येतो, प्रत्येक कलाकारांनी ज्ञानेश्वरी वाचली पाहिजे असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. कला ही देशकालातीत असून आजही भारतीय मानसिकता कलेच्या बाबतीत पुढारलेला नाही. अश्लील चित्र काढले म्हणून राजा रविवर्मा याच्या जीवनातील संघर्ष बोधनकरांनी प्रेक्षकांसमोर चितारला.

कुठलीच कला मुलांपर्यंत पोचत नसल्यामुळे अतिरेकी निर्माण होतात या लोकसत्ताच्या संपादक श्री. गिरीश कुबेरांच्या वचनाचा दाखला देत विद्यार्थ्यांना कुठली तरी कला शिकवली पाहिजे असा मार्मिक सल्ला त्यांनी दिला. कलाकाराची खरी मालमत्ता ही त्याला मिळालेले पुरस्कार, घर, गाड्या ही नसून त्यांनी निर्माण केलेली कला, लेखन, चित्रसंपदा वा साहित्य यांनी ठरते. भारतीय समाज सध्या कलांना विसरत जात आहे, पातंजल योगसूत्रातील मन, बुद्धी, चित्त व अहंकार या चार महत्त्वाच्या बिंदूंकडे लक्ष वेधत श्री. बोधनकरांनी मानवी मनाच्या संवेदनशीलतेचे कप्पे उलगडून दाखवले. भारतीय समाजात कलेला अजूनही तेवढी किंमत मिळत नसून 'मला कलेतलं काही कळत नाही' असं मोठ्या

फुशारकीने सांगणाऱ्या लोकांकडे बघून मोठं आश्चर्य वाटतं असं ते म्हणाले.

महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रुचिता गव्हाणे यांनी केले. तसेच कार्यक्रमाच्या संयोजनाची जबाबदारी प्रा. संतोष राणे व डॉ. महेश पाटील यांनी सांभाळली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### 'Road to Health and Safety through Environment Protection' या विषयाची एक दिवशीय राष्ट्रीय परिषद संपन्न




**परिषदेच्या शोधनिबंध पत्रिकेचे प्रकाशन**

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे या संस्थेच्या माहिती–तंत्रज्ञान केंद्रातर्फे 'Road to Health and Safety through Environment Protection' या विषयाची एक दिवशीय राष्ट्रीय परिषद दि. १७ फेब्रुवारी २०१८ रोजी सकाळी ९.०० ते ५.०० या वेळेत बाजीराव पेशवे सभागृह, कॉलेज कॅम्पस येथे पार पडली. संख्या नेहमीच ज्वलंत विषयावर घडणाऱ्या घडामोडीची विस्तृत चर्चा व्हावी यासाठी प्रयत्नशील असते. म्हणूनच संस्था अशा परिषदाचे आयोजन घडवून आणते.

सदस्य परिषदेची सुरुवात सरस्वती वंदनाने झाली. प्रसंगी डॉ. दि. कृ. नायक (परिषदेचे प्रमुख आणि प्राचार्य वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे) यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले आणि परिषद आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. 'आपल्या जीवनात सुरक्षिततेची अत्यंत जरुरी आहे. त्यासाठी त्यासंबंधीचे शिक्षण आणि उपाययोजनांचा आढावा घेणे गरजेचे आहे. तसेच सामान्यजनाचे जीवन आणि मालमत्ता यांचे नुकसान होऊ नये' असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रोफेसर व्ही. एस. भाकरे (माजी अध्यक्ष पावर कोटिंग्ज: Hard Castel and Ward मॅन्युफॅक्चरिंग कंपनी) यांनी 'हरित आणि स्वच्छ भारत' या विषयी विचार व्यक्त केले. दरम्यान परिषदेच्या शोधनिबंध पत्रिकेचे प्रकाशन परिषदेचे प्रमुख पाहुणे डॉ. शिरीष सांगळे (डीन आणि प्राध्यापक Sustainable Business at National Institute of Industrial Engineering (NITIE), मुंबई) यांचे शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. प्रसंगी त्यांनी कंपन्यांनी लघु आणि दीर्घ वेळेचे कसे नियोजन करावे व लाभ कसा उठवावा हे सांगितले. व्यवसायाची आवाहने फक्त पैसा, मशीन आणि मटेरियल नसून त्याचबरोबर पाणी तुटवडा, हवामान बदल आणि विविध प्रकारचे पर्यावरणीय घटक हे सुद्धा आहेत हे स्पष्ट केले.

प्रमुख सन्माननीय पाहुणे डॉ. डी. डी. काळे (माजी प्राध्यापक ICT मुंबई) यांनी प्लास्टीक उद्योगावर आपले विचार मांडले. विविध प्रकारच्या प्लास्टिक उद्योगासंबंधीची माहिती दिली. उदा. थर्मोप्लास्टिक, पुनर्निमिती आणि पुनर्वापर, पॅकेजिंग मटेरियल, वाया जाणाऱ्या प्लास्टिक व्यवस्थापन पद्धती, प्लास्टिक ज्वलन इत्यादी.

दरम्यान परिषदेस सहाय्य करणाऱ्या संस्थांचा गौरव करण्यात आला. आणि शेवटी परिषदेच्या संघटन सचिव प्रा. सौ. स्मिता डी. खंडागळे यांनी आभार प्रदर्शन केले.

मित्र हे हिऱ्यासारखे असतात. ते मिळवणे कठीण आणि त्यांना गमावणे त्याहून जास्त दुःखदायक.

सदर परिषदेत सादर केलेले निबंध आणि निबंधकर्ते खालीलप्रमाणे –

| सादरकर्ते | विषय |
|---|---|
| १) श्री. भारत लोंढे (ग्लोबल EHS Head, Piramal Pharma Solutions, Mumbai) | Environment Management for Business Sustainability |
| २) श्री. मुकुंद हुलयालकर (डायरेक्टर, पेंटटेक कन्सल्टंन्ट मुंबई) | Road to Health and Safety through surface coatings and allied products |
| ३) श्री. मुग्धा कुलकर्णी (डेप्युटी मॅनेजर EHS Sustainability Fiat India Automobiles Pvt. Ltd. मुंबई | Sustainability Reporting (GRI G-4) |
| ४) डॉ. अलोक मोदी आणि सहकारी | Cardiopulmonary resuscitation (CPR) |
| ५) श्री. अलोक मिश्रा (जनरल मॅनेजर कार्पोरेट इन्व्हॅमेन्ट, रियालंन्स इंडस्ट्रिज लि. मुंबई) | Environment protection through energy conservation, water conservation and waste reduction. |
| ६) श्री. अजित खानदेशे (व्यवस्थापकीय संचालक, मेसर्स केवान इनव्हॉमेंटल सोल्यशन्स इंडिया प्रा. लि. अंबरनाथ) | Sewage treatment and reuse using Membrance Bioreactor (MBR) |
| ७) श्री. बाजीराव देढे (प्रमुख व्यवस्थापक, कार्पोरेट (EHS, पिरामल फार्मा सोल्युशन मुंबई) | Environmental Management System ISO-14001:2015 |

सदर वरील निबंध पहिल्या आणि दुसऱ्या सत्रात सादर झाले. त्याचे काम श्री. दिलीप राघवन (मॅनेजिंग डायरेक्टर कलर पब्लिकेशन प्रा. लि. मुंबई) आणि श्री. अरुण दातार (पार्टनर, पुराज केमिकल्स आणि सिताराम केमिकल्स अंबरनाथ) यांनी पाहिले.

दरम्यान श्री. सुनील मेहता (डायरेक्टर जयको सेफ्टी प्रोडक्टस् प्रा. लि.) यांनी सेफ्टी साधने यामध्ये Fire Escape Mask; Innovative Ladder आणि confined space rescve kit इत्यादी उत्पादनाचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखविले. आणि मानिनी विभूती कुलकर्णी (डायरेक्टर अंगली एन्टरप्राजेस, ठाणे) यांनी Doors to product life, property and environment याविषयीचे प्रात्यक्षिक दाखविले.

सदर परिषदेस विविध नामांकित संस्थेतून आणि उद्योग जगतातून जवळ जवळ दोनशे प्रतिनिधी हजर होते. चांगल्या व नेटक्या परिषदेच्या व्यवस्थापनाबद्दल उपस्थित मान्यवर आणि प्रमुखांनी गौरवोद्गार काढले.

**विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनच्या 'Innovision' वार्षिकाचे प्रकाशन**



नाती ही झाडाच्या पानांसारखी असतात. एकदा तुटली की त्याची हिरवळ कायमची निघून जाते.

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनच्या Innovision २०१७-१८ या वार्षिकाचे प्रकाशन शनिवार दि. ७ एप्रिल २०१८ रोजी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत तंत्रनिकेतनच्या ए. व्ही. रुममध्ये प्रा. पी. जी. सायगावी (सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई) यांचे शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. प्रसंगी सदर कार्यक्रमाला विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास डॉ. ए. के. कुरेशी (प्राचार्य, साबुशिहदकी तंत्रनिकेतन, मुंबई) डॉ. डी. के. नायक (प्राचार्य, वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे) Innovision च्या संपादिका सौ. वैशाली सोनावणे इत्यादी व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रथम डॉ. डी. के. नायक यांनी प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे भेट वस्तू देऊन स्वागत केले व आपले मनोगत व्यक्त केले. प्रसंगी प्रोफेसर पी. जी. सायगावी आणि डॉ. ए. के. कुरेशी यांची उपस्थितांना ओळख करून दिली.

Innovision च्या संपादिका सौ. वैशाली सोनावणे यांनी आपले संपादकीय अनुभव उपस्थितांना ऐकविले. सतत दहा वर्ष संपादक म्हणून जबाबदारी दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांचे आभार व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे आणि मान्यवरांचे शुभहस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा भेट वस्तू आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुणे श्री. पी. जी. सायगावी यांनी संस्था गेली अनेक वर्षे सतत विविध उपक्रम राबवीत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. परिषद, चर्चासत्रे, कार्यशाळा, विविध प्रकारची प्रशिक्षणे आणि स्पर्धा इत्यादी उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना नवनवीन ज्ञान प्राप्त होण्यात मदत होते व त्यांना एक प्रकारचे व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होत असते. सतत सुधारण्याचा ध्यास (TQM) संस्था घेत असल्याचं प्रतिपादन त्यांनी केले. Innovision माहितीपर आणि सुबक असल्याचेही त्यांनी म्हटले.

२०१७-१८ हे वर्ष दिवंगत डॉ. वा. ना. बेडेकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यामुळे सदरचे वार्षिक हे त्याच्या स्मरणार्थ आवृत्ती काढण्यात आली आहे.

प्रसंगी Innovision विद्यार्थी कमिटीतील विद्यार्थ्यांनीही आपापले अनुभव मांडले.

शेवटी प्रा. सौ. राजी नायर हिने आभार प्रदर्शन व्यक्त केले.

**अभिनंदन !**

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनच्या प्रा. सौ. कीर्ती सतीश आगाशे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त**



देशातील प्रसिद्ध तांत्रिक शिक्षण देणाऱ्या 'वीर जिजामाता टेक्निकल इन्स्टिट्यूट (VJIT) मुंबई या अग्रगण्य संस्थेकडून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या इंडस्ट्रियल इंजिनियरिंग विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. कीर्ती सतीश आगाशे यांना इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगमध्ये नुकतीच पीएच.डी. (Doctor of Philosophy) पदवी प्रदान करण्यात आली.

Performance Optimization of Memristori A Nano Scale Resistive Switching Device ह्या विषयावर त्यांनी प्रबंध सादर केला होता.

त्यांना डॉ. निशा पी. सरवदे व डॉ. संगीता जोशी (इलेक्ट्रीकल इंजिनियरिंग विभाग, VJIT मुंबई) यांचे मार्गदर्शन लाभले.

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

इंग्रज साम्राज्यवाद्यांना आपल्या संस्कृतीने सर्वच क्षेत्रांमध्ये गाठलेल्या उंचीबद्दल आश्चर्य वाटत होते. 'व्यवसाय' आणि 'कौशल्या'वर विणलेला समाज, त्यांना आणि आजच्याही काही अभ्यासकांना आकलनच होऊ शकत नाही. या समाजव्यवस्थेला बांधून ठेवण्याचे काम आपला धर्म वेगवेगळ्या स्तरांवर, नीतिनियमांची रचना करून, 'अव्यवस्थे'पासून परावृत्त करत होता.

इंग्रज हे मूलतः भारतामध्ये व्यापाराकरता आले होते. भारताला भेट देऊन परतलेल्या प्रवाशांनी लिहिलेल्या वर्णनांमध्ये भारतातील सुबत्तेचे वर्णन प्रामुख्याने असे. युरोपमधील विज्ञान आणि औद्योगिक क्रांतीमुळे वस्तूंच्या निर्मितीचे 'यांत्रिकी'करण व्हायला लागले. व्यक्तीच्या कौशल्यापेक्षा यंत्राच्या कौशल्याला महत्त्व आहे. त्यातूनच 'बाजारा'च्या अर्थकारणाची निर्मिती झाली. मालक आणि कामगार या संस्था निर्माण झाल्या. भारतामधील 'वस्तु'निर्मितीचे केंद्र हे कुटीर उद्योगावर आधारित होते. प्रत्येक 'खेडं' हे त्यांचा 'केंद्रबिंदू' होता. म्हणूनच समाजाचे अर्थकारण आणि समाजकारण हे परस्परावलंबी होते. कौशल्यशिक्षणाचा 'अभ्यासक्रम' म्हणजे वस्तूंच्या निर्मितीचा 'स्वानुभव' आणि वडिलधाऱ्यांचे 'मार्गदर्शन' हाच होता. पाठशाळेतील शिक्षणाकरता गुरूगृही जायला लागायचे. त्या शिक्षणाचा स्तर आणि रचना ही सर्वतः भिन्न होती. पाठशाळेतील गुरू हा चार भिंतीच्या आतील शिक्षणाचा गुरू होता. तर व्यवसाय शिक्षणाचा गुरू हा त्यांचे घर, आणि घरातील अधिक कुशल घटक हेच होते.

इंग्रजांच्या व्यापारी धोरणाचा एक भाग म्हणून भारतातही मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण चालू झाले. याचा परिणाम हळूहळू कौशल्यावर आधारित व्यवसायावर व्हायला लागला. नवीन शहर आणि बाजारपेठा निर्माण व्हायला लागल्या. महसुलापासून सगळ्या नागरिक व्यवहाराला लागणाऱ्या संस्थांचा कारभार इंग्रजांच्या हातात आला होता. यांच्या आणि इतर व्यवस्थांच्या गरजेतून इंग्रजांना वेगळ्या 'कारकून' वर्गाची गरज भासू लागली. मेकॉलेच्या शिक्षण धोरणाच्या इतिवृत्तांचा मूळ गाभा हा हे असे 'कारकून' घडवण्याचा आहे. साहजिकच अशा शिक्षणाला हवे असणारे साहित्य हे इंग्रजीमध्ये सहज उपलब्ध होते. शिवाय हाडामासांनी ही माणसं भारतीय असली तरी, सांस्कृतिक विचारांनी ती पाश्चात्य विचार आणि धर्माशी सुसंगत असायला हवी होती. म्हणून पहिली पाटी कोरी करणे आवश्यक होते. पहिली व्यवस्था किंवा संस्कृती ही असभ्य, असंस्कृत, मागासलेली असल्याचे भासवून, नवीन शिक्षण पद्धतीच्या रोपणानी तिला मूठमाती देता येईल असा मेकॉले आणि धर्मप्रसारकांचा विश्वास होता.

यांत्रिकीकरणामुळे बहुसंख्य कौशल्यविकास हे शिक्षण कालबाह्य व्हायला लागले. प्रश्न होता तो पाठशाळेतील पंडिती शिक्षणाचा. ती व्यवस्था नष्ट करणे हे सोपे काम नव्हते. धर्मप्रसारकांनी हे काम तत्कालीन सामाजिक वैगुण्याचे खापर जातीवर्ण व्यवस्थेवर करून या प्रक्रियेला सुरुवात केलीच होती. नवीन शिक्षणव्यवस्थेची सुरुवात म्हणूनच परंपरागत पंडिती शिक्षणाच्या माध्यमातून चालू झाली. परंपरागत शिक्षणाची निरुपयोगिता, आणि कालबाह्यता पाश्चात्य विज्ञानाचे श्रेष्ठत्व, आणि इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणातून यशस्वीरित्या साधण्यात आली. काही दशकातच बनारस, मुंबई पुण्याचे पंडित मोठ्या प्रमाणात इंग्रजी शिक्षणाकडे वळू लागले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरवातीला यातूनच मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व आणि सुधारकांची मोठी फळी तयार झाली. अर्थातच या शिक्षणातून असे काही निर्माण होईल अशी अपेक्षा नव्हती.

माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन (Mount Stuart Elphinstone) हा १८१८ ला पेशवाई खालसा झाल्यानंतर मुंबई प्रांताचा राज्यपाल झाला. या नवीन शिक्षणाचा खरा पाया हा यानेच महाराष्ट्रात घातला. सुरुवातीला पाठशाळांना मदत केल्याचा बनाव त्यांनी केला, पण काही दशकातच नवीन इंग्रजी शिक्षणाकडे पंडित वर्गाला आकर्षित करण्यात तो यशस्वी ठरला. याचवेळेला एकापाठोपाठ एक नवीन शिक्षण देणाऱ्या संस्था काढण्याचा त्यांनी सपाटाच लावला. १८२३ मध्ये भारतातल्या पहिल्या अभियांत्रिकी शिक्षणाला जॉर्ज जार्विस (George Jarvis) यांनी सुरुवात केली. पुणे संस्कृत महाविद्यालय १८२१ ला चालू झाले. एलफिन्स्टनच्या नावानी मुंबईला १८२७ मध्ये महाविद्यालय चालू झाले. १८४५ ला मुंबईला ग्रँड मेडिकल कॉलेज सुरू झाले. १८५७ ला मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली.

या नवीन शैक्षणिक धोरणाकरता मोठ्या प्रमाणावरती शैक्षणिक साहित्याची गरज होती. नव्याने प्रशिक्षित झालेला पंडित वर्ग याकरता उपयोगी पडला. बाळशास्त्री जांभेकर, हरी केशवजी पाठारे, भाऊ महाजन, विनायक लक्ष्मण छत्रे, भाऊदाजी लाड, सखाराम अर्जुन राऊत अशा अनेकांनी इंग्रजीतील विज्ञान पुस्तकांचे मराठीमध्ये भाषांतर करून ही प्रक्रिया सुकर केली. कोल्हापूरचे बाळाजी प्रभाकर मोडक यांनी त्याकाळी ३५ हून अधिक वैज्ञानिक पुस्तके मराठीतून लिहिली. सुरुवातीला एलफिन्स्टनने या भाषांतराच्या कामाला प्रोत्साहन देण्याकरता अर्थसहाय्य दिले. पेशवाई खालसा झाली असली तरी पंडितांना पेशवे जी दक्षिणा देत ती प्रथा एलफिन्स्टनने चालू ठेवली. या फंडातूनही पुस्तकांच्या भाषांतराला मोठ्या प्रमाणावर मदत केली गेली. १९ व्या शतकात मराठीतील शास्त्रीय वाङ्‌मयाचा आढावा जी. एन्. सहस्त्रबुद्धे यांनी १९०८ च्या विविध ज्ञान विस्तारांमध्ये घेतला आहे. अर्थातच यातील बहुतेक पुस्तके ही पाश्चात्य विज्ञानाची भाषांतरेच आहेत.

परंपरागत शिक्षणाकरता लागणारे साहित्य भारतामध्ये विपुल प्रमाणात उपलब्ध होते. आजच्या इंग्रजीप्रमाणे त्याकाळी ज्ञानभाषा 'संस्कृत' होती. ख्रिस्ती धर्मप्रसारक आणि अधिकारी वर्गाने ही भाषा शिकली. एवढेच नाहीतर त्या भाषेवर नैपुण्यही मिळवले. त्या पुंजीवर ते प्रांतीय भाषाही शिकायला लागले. बंगाली, मराठीपासून ते तमिळपर्यंतची सर्व भाषांतील व्याकरणे ही १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात या धर्मप्रसारकांनी लिहिली. शिक्षणाकरता व्याकरणाप्रमाणेच शब्दकोष, माहितीचे कोष लागतात. मराठीमधील हे सुरुवातीचे बहुतेक सगळे कोष हे साहेबांनी लिहिलेले आहेत. शिक्षण पद्धतीतील आमूलाग्र बदलाच्या मेकॉलेच्या स्वप्नाकरता या साधनांची नितांत आवश्यकता होती. अर्थातच भाषांतराचा हा उपक्रम २० व्या शतकामध्ये त्या उत्साहाने होऊ शकला नाही. नवीन विज्ञानाची प्रगती आणि मातृभाषेतून त्याची उपलब्धता यामध्ये खूप मोठे अंतर पडायला लागले. स्वातंत्र्यानंतर मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आला असला तरी, त्याकरिता हव्या असणाऱ्या साहित्य निर्मितीकडे मात्र दुर्लक्षच झाले. साहजिकच लोकांचा कल हा इंग्रजी माध्यमाकडे झुकायला लागला. आज त्यांनी परिसिमा गाठली असून, महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांमध्ये मराठी शाळा बंद करून नव्याने इंग्रजी शाळा उघडल्या जात आहेत. मेकॉले खऱ्या अर्थाने विजयी झाल्याचे चित्र आज आहे.

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत बाळाजी प्रभाकर मोडकांसारखा एकही भाषांतकार होऊ शकला नाही. विज्ञानाला 'प्रमाण' भाषेची गरज असते. मेजर कँडीला जे १८३०-४० साली उमगले, ते आजही आपल्या लक्षात येत नाही. मेजर कँडीने मराठीला 'प्रमाण भाषा' करण्याकरता, आणि भाषांतरामध्ये अचूकता आणण्याकरता

---

आयुष्यातील सर्वात मोठे यश म्हणजे आपल्यामुळे आई-वडिलांच्या चेहऱ्यावर असणारा आनंद आणि समाधान.

केलेले प्रयत्न अभिनंदनीय तर आहेतच पण ते अनुकरणीयही आहेत. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर मराठीकरता अनेक संस्था निर्माण झाल्या. काही अपवाद वगळता त्या सगळ्या राजकारणाच्या आखाडा झाल्या. त्याचा व्हायचा तोच परिणाम आज आपण बघत आहोत. आधुनिक विज्ञान दरदिवशी प्रगत होतेय. हे बहुतेक संशोधन पाश्चात्य देशांत होते. ते मराठीत आणण्याकरता 'परिभाषे'ची गरज आहे. मराठीच्या विद्वानांना बोलीभाषेची जास्त काळजी आहे. (त्यांची भाषणे मात्र ते प्रमाण मराठी भाषेतच लिहितात.) साहजिकच प्रगत विज्ञान आज मराठी भाषेत उपलब्ध नाही. मराठीचे खरे मारेकरी आपणच आहोत, मेकॉले नाही.

आज भारतीय शिक्षणाचे संपूर्णतः सरकारीकरण झाले आहे. अभ्यासक्रमापासून शिक्षकांच्या नियुक्तीपर्यंत सगळे अधिकार सरकारकडे आहेत. परीक्षा, शिक्षकांचे पगार, शालेय किंवा महाविद्यालयीन शुल्क म्हणजेच शिक्षण अशी शिक्षणाची व्याख्या झाली आहे. 'आरक्षण' आणि 'फुकटेपणा'मुळे शिक्षणातील दर्जाला जवळजवळ मूठमाती मिळाली आहे. जाती निर्मूलनाखाली जन्मापासून जात घट्ट करण्याचे शिक्षणामधील धोरण हे 'अनाकलनीय' आणि 'आत्मघातकी' आहे.

भारत हा लोकसंख्येने जगातला दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. साक्षरता म्हणजे शिक्षण हे समीकरण खरे धरले तर भारत हा ८०% पेक्षा जास्त आज साक्षर आहे. तरीही जगातल्या संशोधन आणि विज्ञान प्रक्रियेमध्ये भारताचे योगदान १%ही नाही. 'नेचर' या जगातल्या सर्वात प्रसिद्ध विज्ञान पत्रिकेने या संदर्भातील एक सूची प्रकाशित केली आहे. २०० संस्थांच्या या सूचीमध्ये १६२ आणि १८५ वा क्रमांक, अशा फक्त दोन भारतीय शिक्षण संस्थांचा त्यामध्ये समावेश आहे. आपण ज्या चीनशी बरोबरी करतो त्याच्या १४ संस्थांचा या यादीमध्ये समावेश आहे. पहिल्या ५० मधील ३८ संस्था या अमेरिकेतील आहेत. भारतीय शिक्षणसंस्थेतील शैक्षणिक दर्जाची वस्तुस्थिती दाखवणारा यापेक्षा चांगला दुसरा आरसा कोणता आहे?

चार भिंतींमधील शिक्षणा एवढंच या भिंतीबाहेरील राजकीय आणि सामाजिक व्यवस्थाही व्यक्तीला शिक्षित करीत असते. माध्यमाइतकेच सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांनाही महत्त्व असते हे मेकॉलेला जेवढे कळले, तेवढेही आजच्या स्वतंत्र भारतातील राजकारण्यांना समजतेय असे दिसत नाही. शिक्षण व्यक्तीला 'विवेक' आणि 'उचित निर्णय' घेण्याची क्षमता देते. यातूनच 'व्यक्तिमत्त्व', आणि 'चारित्र्य' घडते. अशी चारित्र्यवान माणसेच देश घडवतात. मेकॉलेला हाडामासाची भारतीय पण विचार आणि संस्कृतीनी पाश्चात्य असा समाज, साम्राज्यवाद जगवण्याकरता तयार करायचा होता. आपले स्वातंत्र्य टिकवायचे असेल, सांस्कृतिक 'वसाहतवादा'पासून त्याला वाचवायचे असेल तर, हाडामासांप्रमाणेच विचारांनीही भारतीय घडवणारे शिक्षण त्याला मिळायला हवे.

म्हणूनच आज खरी गरज आहे ही 'भारतीय' मेकॉलेची.

**– डॉ. विजय बेडेकर**

●●●

(सौजन्य : मृद्‌गंध स्मरणिका – डिसेंबर २०१७)

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा

❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण

❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.